





पश्चिम विदर्भातील सर्वाधिक खपाचे अग्रगण्य सायं दैनिक

# सिटी न्यूज सुपरफास्ट

अकोला ■ वर्ष १५ ■ अंक ३१४ ■ रविवार, दि.२४ मे २०२६ ■ मुल्य ५ रुपये ■ पृष्ठे ८

RNI No.- MAHMAR/ 2012 / 49642 ■ Postal Regn. No. AKL DN /283 / 2024-2026 http://epaper.citynewssuperfast.com


# ट्रेनजवळ स्फोट ; 23 जण ठार

## पाकिस्तान हादरले !





वृत्तसंस्था २४ मे

क्वेटा : पाकिस्तानच्या बलुचिस्तान प्रांताची राजधानी क्वेटा येथे एक भीषण घटना घडली. क्वेटा येथील चमन फाटक परिसरात एका पॅसेंजर ट्रेनला लक्ष्य करून करण्यात आलेल्या आत्मघाती हल्ल्यात किमान २३ प्रवाशांचा जागीच मृत्यू झाला आहे. तर, ४७ हून अधिक जण गंभीर जखमी झाले आहेत. प्राथमिक तपासानुसार, जास्तीत जास्त जीवितहानी करण्याच्या उद्देशाने रचलेला हा एक पूर्वनियोजित कट होता. या घटनेने परिसरात एकच खळबळ माजली आहे.

रेल्वे ट्रॅकच्या अगदी जवळ हा भीषण स्फोट घडवून आणण्यात आला. ज्यावेळी पॅसेंजर ट्रेन या मार्गावरून जात होती, नेमकी तीच वेळ साधून हा स्फोट करण्यात आला. स्फोट इतका तीव्र होता की त्याचा आवाज दूरपर्यंत ऐकू आला आणि परिसरात एकच खळबळ उडाली. या स्फोटात ट्रेनमधील आणि रेल्वे ट्रॅक परिसरातील नागरिकांचा आपला जीव गमवावा लागल्याचे सांगण्यात आले. घटनेची माहिती मिळताच स्थानिक नागरिक आणि वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेतली. सुरक्षा दलांनी तातडीने संपूर्ण परिसराला वेढा घातला असून सुरक्षा कडक केली आहे. स्थानिक लोकांच्या मदतीने आपत्कालीन बचाव पथकाने जखमींना जवळच्या रुग्णालयात दाखल केले. रुग्णालयातील डॉक्टरांनी दिलेल्या माहितीनुसार, अनेक जखमींची प्रकृती अत्यंत चिंताजनक असल्याने मृतांचा आकडा आणखी वाढण्याची भीती व्यक्त केली जात आहे.

पोलीस आणि सुरक्षा यंत्रणांकडून या आत्मघाती हल्ल्याचा सखोल तपास केला जात आहे. स्फोटाचे नेमके कारण आणि आत्मघाती हल्लेखोराचे धागेदोरे शोधण्यासाठी घटनास्थळावरून पुरावे गोळा केले जात आहेत. अद्याप कोणत्याही दहशतवादी संघटनेने या हल्ल्याची जबाबदारी स्वीकारलेली नाही, मात्र पोलीस सर्व बाजूंनी या प्रकरणाचा तपास करत आहेत.

# अबब.. बोकडाची किंमत एक लाख !

♦ बकरी ईदसाठी बोकडांची ढोर बाजारात मोठी आवक

प्रतिनिधी २४ मे



**अकोला :** आतापर्यंत आपण बोकडाची किंमत १० ते १५ हजारांपर्यंत पाहिली असेल. मात्र रविवारी ढोर बाजारात बोकडाची किंमत तब्बल लाखाच्यावर ऐकून अनेकांच्या पायाखालची वाळूच सरकली. आगामी बकरी ईदच्या पार्श्वभूमीवर या बाजारात विविध जातीचे व धष्टपुष्ट बोकड विक्रीसाठी आले आहेत.

देशभरात २७ मे रोजी बकरीद (ईद-उल-अजहा) साजरी केली जाईल. बकरी ईद जवळ येत असल्याने, शहरातील वाशिम बायपास परिसरात असलेल्या ढोर बाजारात मोठ्या प्रमाणात बोकडांची आवक वाढली आहे. बाजारात खरेदीदार आणि व्यापाऱ्यांची मोठी गर्दी दिसून येत आहे. रविवारी ढोर बाजारात जमनापारी, बेरारी, अजमेरी, सिरोही, गुजरी आदी जातीच्या वजनी आणि शानदार कद काठीच्या बोकडांच्या प्रजाती पहावयास मिळाल्या. ढोर बाजारात जिल्ह्याच्या ग्रामीण परिसरासह विविध राज्यातील व्यापाऱ्यांनी सुद्धा आपले धष्टपुष्ट बोकड विक्रीसाठी आणले आहेत. त्याचबरोबर विविध राज्यातील व्यापारी सुद्धा खरेदीसाठी आले आहेत. ज्यामुळे बाजारातील वर्दळीत आणखी भर पडली आहे.

बाजारात लहान ते मोठ्या आणि आकर्षक अशा सर्व प्रकारच्या बोकडांची जोरदार खरेदी-विक्री सुरू आहे. साधारणत: १० हजार ते एक लाख रुपयांपर्यंतच्या किमतीत बोकड उपलब्ध आहेत. खरेदीदार बोकडांचे आरोग्य, वजन, उंची आणि जात या बाबींचा विचार करत आहेत. बाजारात कमी किमतीत बोकड मिळणे अवघड झाले आहे. धष्टपुष्ट आणि निरोगी बोकड आकर्षणाचे केंद्र बनले आहेत. बोकडांच्या खरेदीसाठी बाजारात घासाघीस अव्याहतपणे सुरू आहे.

मुस्लिम समाजात या सणाबद्दल प्रचंड उत्साह दिसून येत आहे. लोक आपल्या कुटुंबासह आणि मुलांसोबत बकऱ्या खरेदी करण्यासाठी येत आहेत. व्यापाऱ्यांचा विश्वास आहे की, बकरीद जवळ येत असल्याने बाजारात चांगली विक्री होण्याची शक्यता आहे. आतापर्यंत शेकडो बोकड विकल्या गेले आहेत. विशेष बाब ही की खरेदीदारांपेक्षा बोकडांना पाहणाऱ्यांची गर्दी बाजारात अधिक दिसून येत आहे

# आयशर कंपनीच्या ट्रॅक्टर शोरूमला भीषण आग

प्रतिनिधी २४ मे

**अकोला:** शहरातील शिवणी परिसर येथील आयशर कंपनीच्या ट्रॅक्टर शोरूमला रविवारी सकाळी ८:०० वाजताच्या सुमारास भीषण आग लागली. पाहता पाहता या आगीने रौद्ररूप धारण केले. ट्रॅक्टर शोरूमच्या जवळच पेट्रोल पंप असल्याने परिसरातील नागरिकांमध्ये घबराट पसरली होती.

शहरातील शिवणी परिसरात राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ६ ला लागूनच असलेल्या आयशर कंपनीच्या ट्रॅक्टर शोरूमला सकाळी ८:०० वाजताच्या सुमारास आग लागली. ट्रॅक्टर शोरूमच्या खाली कंपनीचे गोदाम होते. या गोदामाच्या आतून सकाळी धूर निघत असल्याचे काही लोकांना दिसले आणि बघता बघता आगीने उग्र रूप धारण केले. ट्रॅक्टर शोरूमच्या अगदी बाजूलाच पेट्रोल पंप असल्याने परिसरातील



नागरिकांमध्ये प्रचंड भय निर्माण झाले होते. सुरक्षेचा उपाय म्हणून तात्काळ पेट्रोल पंप रिकामा करण्यात आला. आगीची माहिती मिळताच अग्निशामक दलाच्या गाड्या घटनास्थळी दाखल होण्यास सुरुवात झाली. ही आग इतकी भीषण होती की, खालच्या गोदामातून आगीच्या ज्वाला ट्रॅक्टर शोरूमच्या वरच्या मजल्यापर्यंत पोहोचत होत्या. आगीमुळे संपूर्ण परिसरात काळ्या धुराचे मोठे साम्राज्य पसरले होते. गोदामाच्या आत धूर भरल्यामुळे अग्निशामक दलाच्या जवानांना आग विझवण्यासाठी खाली उतरणे कठीण झाले होते. तरीही, आगीवर नियंत्रण मिळवण्यासाठी अग्निशामक दलाचे कर्मचारी जीवाची परवा न करता मोर्च्यावर पाय रोवून उभे होते. आयशर कंपनीच्या या गोदामात काही ट्रॅक्टर, ऑइल, टायर्स इत्यादी साहित्य भरलेले होते, ज्यामुळे हे गोदाम धू-धू जळू लागले. बघता बघता सर्व काही जळून खाक झाले. गोदामाच्या आतून एकामागून एक स्फोटांचे आवाज येत होते, ज्यामुळे उपस्थित नागरिकांच्या छातीत धडकी भरली होती. अथक प्रयत्नांनंतर आगीवर नियंत्रण मिळवण्यात आले. सुदैवाने या घटनेत कोणतीही जीवितहानी झाली नाही. मात्र, आग विझवताना आपले कर्तव्य बजावणारा अग्निशामक दलाचा एक कर्मचारी किरकोळ जखमी झाला. हे वृत्त लिहेपर्यंत अग्निशामक दलाच्या ७ गाड्या आग विझवण्यासाठी वापरण्यात आल्या होत्या, तरीही आग धुमसतच होती.

# पारस औष्णिक विद्युत केंद्रात अपघात; दोन जखमी

प्रतिनिधी २४ मे

**अकोला :** पारस येथील औष्णिक विद्युत केंद्राच्या संच क्र ४ मधील बंद असलेल्या कोलमिलचे देखभालीचे काम करत असताना लगतची कोलमिल प्रेशराईज झाल्यामुळे शनिवारी सकाळी ९:३० वाजता अपघात झाला. यामध्ये दोन कामगार जखमी झाले. पारस येथील रहिवासी शेख अकरम उर्फ याकूब हे आगीच्या संपर्कात आल्याने भाजले गेले, तर कांचन ढिगोळे, रा. उरळ, हे पडल्यामुळे जखमी झाले. दोन्ही जखमींना तातडीने उपचारासाठी अकोला येथे खसगी रुग्णालयात दाखल करण्यात आले असून त्यांच्यावर उपचार सुरू आहेत.

# अकोल्यासह तीन जिल्ह्यात उष्णतेचा रेड अलर्ट

## मध्य महाराष्ट्र, मराठवाड्यात मेघगर्जनेसह पाऊस

प्रतिनिधी २४ मे

**नागपूर :** अंदमानात दाखल झालेला मान्सून २६ मे पर्यंत केरळात दाखल होण्याची शक्यता असतानाच नागपूरसह मुंबई, सांगली, सातारा, सोलापूर, पुण्यात ठिकठिकाणी मान्सूनपूर्व पावसाने हजेरी लावली आहे. तर दुसरीकडे विदर्भ मात्र उष्णतेच्या लाटेने बेजार झाला असून, अकोला, अमरावती व वर्धा जिल्ह्याला उष्णतेच रेड अलर्ट जारी केला आहे. अंदमानात दाखल झालेला मान्सून २६ मे पर्यंत केरळात दाखल होण्याची शक्यता असतानाच नागपूर, मुंबई, सांगली, सातारा, सोलापूरसह पुण्यात ठिकठिकाणी मान्सूनपूर्व पावसाने हजेरी लावली आहे. तर दुसरीकडे शनिवारसह रविवारीही अकोला, अमरावती आणि वर्धा या तीन जिल्ह्यांसाठी उष्णतेच्या लाटेचा रेड अलर्ट जारी करण्यात आला आहे. शुक्रवारी ब्रह्मपुरी येथे ४७.२ अंश सेल्सिअस एवढ्या कमाल तापमानाची नोंद झाली आहे. मान्सून आगेकूच करत असतानाच हवामानातील उल्लेखनीय बदलांमुळे पश्चिम महाराष्ट्रातील जिल्ह्यांत मान्सूनपूर्व पावसाने हजेरी लावली आहे. विदर्भातील तीन जिल्ह्यांत रेड अलर्ट असतानाच सोमवारपर्यंत यवतमाळ, नागपूर, चंद्रपूर या जिल्ह्यांना ऑरेंज अलर्ट जारी करण्यात आला आहे. दक्षिण कोकण-गोवा, मध्य महाराष्ट्र व मराठवाड्यातील जिल्हांमध्ये तुरळक ठिकाणी हलका ते मध्यम पाऊस किंवा मेघगर्जनेसह पाऊस पडण्याची शक्यता आहे. उत्तर कोकणातील जिल्ह्यांमध्ये तुरळक ठिकाणी मेघगर्जनेसह पाऊस पडण्याचा अंदाज आहे.






# नीट पेपरफुटी प्रकरणात ईडीची एंट्री !

प्रतिनिधी २४ मे

**नवी दिल्ली:** नीट-यूजी २०२६ पेपरफुटी प्रकरणात आता अंमलबजावणी संचालनालयाने (ईडी) उडी घेतली असून, घोटाळ्यातील पैशांचा मागोवा आणि आर्थिक व्यवहारांची चौकशी सुरू केली आहे. सीबीआयच्या तपासानंतर आता ईडीने आरसीसी क्लासेसचे संचालक शिवराज मोटेगावकर याच्या मालमत्ता, बँक व्यवहार आणि गुंतवणुकींची तपासणी सुरू केली आहे. ईडीने मोटेगावकर याच्या मालमत्ता नोंदी, महसूल कागदपत्रे व व्यवहारांची माहिती मागविली आहे. तपास यंत्रणांच्या माहितीनुसार, नीट आणि जेईई कोचिंग व्यवसाय, कथित पेपर विक्री आणि गुंतवणुकीतून मोटेगावकर यांनी मोठी संपत्ती उभी केल्याचा संशय आहे. लातूर, नाशिक, नांदेड, पुणे तसेच अन्य महानगरांमध्ये मोटेगावकर याने भूखंड, इमारती आणि मंगल कार्यालये खरेदी केल्याची माहिती तपासात समोर आली आहे. मोटेगावकर याने २०२३ मध्ये पुण्यातील वारजे परिसरातील मोक्याच्या ठिकाणी सुमारे ५१ गुंठे जमीन खरेदी केली होती.













भारत हा कृषिप्रधान देश म्हणून संपूर्ण जगात ओळखला जातो. भारतीय संस्कृतीचा आत्मा हा शेतीमध्ये आणि शेतकऱ्यांच्या कष्टामध्ये दडलेला आहे. हजारो वर्षांपासून या देशातील शेतकरी आपल्या घामाने भूमीला सुपीक करीत आला, अन्नधान्य निर्माण करीत आला आणि देशाची भूक भागवत आला. परंतु अत्यंत वेदनादायी वास्तव असे आहे की, आज हाच देश 'शेतकरी आत्महत्यांचा देश' म्हणून ओळखला जाऊ लागला आहे. ही बाब केवळ आर्थिक संकटाची नसून सामाजिक, मानसिक आणि शासकीय व्यवस्थेच्या अपयशाची जिवंत साक्ष आहे. शासकीय धोरण शेतकऱ्याचे मरण असेच चित्र सर्वत्र दिसत आहे. आज ग्रामीण भागात फिरल्यास प्रत्येक गावात एखाद्या शेतकऱ्याच्या आत्महत्येची हृदयद्रावक कहाणी ऐकायला मिळते. कुणी कर्जबाजारीपणामुळे विष प्राशन केले, कुणी पिकांचे नुकसान झाल्याने गळफास घेतला, तर कुणी मुलीच्या लग्नासाठी, तेरवी गोड जेवणासाठी घेतलेल्या कर्जाच्या ओझ्याखाली जीवन संपवले. ही केवळ आकडेवारी नाही; तर प्रत्येक मृत्यूमागे उद्ध्वस्त झालेले कुटुंब, अनाथ झालेली मुले आणि आयुष्यभरासाठी विदीर्ण झालेली आई-वडील, पत्नी आणि समाज आहे.

# शेतकरी आत्महत्या रोखण्यासाठी कमी खर्चाची शेती हा उपाय

**शेतकरी आत्महत्यांचे मूळ कारण – वाढता खर्च**

शेतकरी आत्महत्या थांबवायच्या असतील तर फक्त कर्जमाफी पुरेशी नाही. कारण कर्जमाफी ही तात्पुरती मलमपट्टी आहे; मूळ आजार वेगळाच आहे. त्या आजाराचे नाव आहे — 'वाढता खर्च'.

शेतीवरील खर्च कमी झाला तर शेतकरी आत्मनिर्भर होईल. खर्च कमी असेल तर तो बाजारभावावर पूर्णपणे अवलंबून राहणार नाही. आज शेतकरी पेरणीपासून कापणीपर्यंत प्रत्येक टप्प्यावर बाजारावर अवलंबून झाला आहे. बी-बियाणे, खते, औषधे, यंत्रे, डिझेल, मजुरी सर्व काही विकत घ्यावे लागते. या खर्चाच्या साखळीत शेतकरी अडकत चालला आहे. शेवटी पीक निघाले नाही किंवा भाव पडला तर त्याच्यासमोर आत्महत्येशिवाय पर्याय उरत नाही, अशी परिस्थिती निर्माण होते.

**नैसर्गिक शेती आणि सेंद्रिय शेती भविष्याचा मार्ग**

आज काळाची खरी गरज आहे ती नैसर्गिक शेती, सेंद्रिय शेती आणि झिरो बजेट शेतीकडे वळण्याची.

नैसर्गिक शेती म्हणजे निसर्गाशी मैत्री करून शेती करणे. गाय आधारित शेती, जीवामृत, बीजामृत, शेणखत, गांडूळखत यांचा वापर करून जमिनीची सुपीकता टिकवणे. यामुळे उत्पादन खर्च मोठ्या प्रमाणात कमी होतो. आज अनेक शेतकरी कमी खर्चात नैसर्गिक शेती करून चांगले उत्पन्न घेत आहेत. काही वेळा उत्पादन थोडे कमी मिळते; पण खर्च खूपच कमी असल्यामुळे नफा अधिक राहतो. सर्वात महत्त्वाचे म्हणजे शेतकरी कर्जाच्या विळख्यात अडकत नाही.

रासायनिक शेतीमुळे जमीनही थकली आहे. जमिनीतील सेंद्रिय कर्ब कमी झाला आहे. पाण्याची पातळी घसरली आहे. माणसांच्या आरोग्यावर परिणाम होत आहे. त्यामुळे नैसर्गिक शेती ही केवळ आर्थिक उपाययोजना नसून पर्यावरण आणि आरोग्य वाचवण्याची चळवळ आहे.

**गावोगावी पुन्हा निर्माण व्हायला हवी 'सहकार्य संस्कृती'**

पूर्वी गावात परस्पर सहकार्याची भावना होती. शेतकरी एकमेकांच्या शेतात मदतीला जात होते. बियाण्यांची देवाणघेवाण होत होती. लग्नसमारंभ, शेतीकामे, संकटे तेरवी गोड जेवण— सर्व गोष्टी समाज एकत्र येऊन सांभाळत होता. आज माणूस आर्थिकदृष्ट्या नव्हे तर मानसिकदृष्ट्याही एकटा पडला आहे. गावातील एकोपा कमी झाला. स्पर्धा, प्रतिष्ठा, दिखावा आणि बाजारवाद वाढला. परिणामी शेतकरी मानसिक तणावाखाली गेला.

म्हणूनच गावोगावी सहकार्य, सामूहिक शेती, बियाणे बँक, सामुदायिक शेती अवजारे, पाणी व्यवस्थापन यासारख्या उपक्रमांना चालना देणे आवश्यक आहे.

**कमी खर्चाचे लग्न – सामाजिक परिवर्तनाची सुरुवात**

आज ग्रामीण भागात शेतकरी आत्महत्येमागील एक



मोठे कारण म्हणजे सामाजिक प्रतिष्ठेच्या नावाखाली होणारा प्रचंड खर्च. 'विशेषतः लग्नसमारंभात, तेरवी गोड जेवण, वाढदिवस यावर लाखो रुपये खर्च केले जातात.

डीजे, बँड, फटाके, महागडे मंडप, शेकडो पाहुण्यांची जेवणावळ, आहेर, दिखावा या सर्व गोष्टींसाठी कर्ज घेतले जाते. मुलीचे लग्न म्हणजे शेतकऱ्यासाठी आर्थिक संकट बनले आहे. पूर्वी साध्या पद्धतीने लग्ने होत होती. नातेसंबंध आणि संस्कार महत्त्वाचे होते. आज मात्र 'लोक काय म्हणतील?' या मानसिकतेने समाज ग्रासला आहे. म्हणून कमी खर्चाचे, साधेपणाचे, सामाजिक बांधिलकी जपणारे विवाह झाले पाहिजेत. समाजाने प्रतिष्ठेपेक्षा संस्काराला महत्त्व दिले पाहिजे. जर गावोगावी सामूहिक विवाह, साधे विवाह आणि खर्चमुक्त सामाजिक कार्यक्रम वाढले तर शेतकऱ्यांवरील आर्थिक ताण मोठ्या प्रमाणात कमी होईल. शासनाची भूमिका काय असावी? शासनाने केवळ घोषणा न करता प्रत्यक्ष कृती करणे आवश्यक आहे. शेतमालाला हमीभाव मिळाला पाहिजे. नैसर्गिक शेतीला प्रोत्साहन मिळाले पाहिजे. बियाणे कंपन्यांवर नियंत्रण आले पाहिजे. शेतीमाल साठवणूक व प्रक्रिया उद्योग गावोगावी उभे राहिले पाहिजेत. ग्रामीण शिक्षण आणि आरोग्य स्वस्त झाले पाहिजे. शेतकऱ्यांना बाजारपेठेवर थेट अधिकार मिळाला पाहिजे.

फक्त कर्जमाफी नव्हे, तर 'खर्चमुक्त शेती' हे शासनाचे धोरण झाले पाहिजे. युवकांनी शेतीकडे नव्या दृष्टीने पाहण्याची आज गरज आहे. आज ग्रामीण युवक शेतीपासून दूर जात आहेत. कारण शेती म्हणजे तोटा, कर्ज आणि संकट अशी प्रतिमा निर्माण झाली आहे. परंतु जर कमी खर्चाची, तंत्रज्ञान आधारित, प्रक्रिया उद्योग जोडलेली आणि बाजारपेठेशी थेट निगडित शेती निर्माण झाली तर युवक पुन्हा शेतीकडे वळू शकतात. ग्रामीण भागातील बेरोजगारी कमी करण्यासाठी शेती आणि शेतीपूरक व्यवसायांना नवसंजीवनी देणे आवश्यक आहे.

शेतकरी आत्महत्या हा केवळ एका व्यक्तीचा मृत्यू नसतो; तो संपूर्ण समाजाच्या संवेदनशीलतेचा पराभव असतो. आज आवश्यकता आहे ती केवळ आंदोलनांची नाही, तर विचार परिवर्तनाची. शेतकरी जगला तर देश जगेल. त्यासाठी खर्चमुक्त शेती, नैसर्गिक शेती, साधेपणाचे जीवन, कमी खर्चाचे विवाह, सहकार्य संस्कृती आणि शाश्वत विकास या मूल्यांकडे समाजाने पुन्हा वळले पाहिजे. ज्या दिवशी शेतकरी कर्जमुक्त होईल, आत्मनिर्भर बनेल आणि आपल्या कष्टाचा योग्य सन्मान मिळवेल, त्या दिवशी आत्महत्यांचे सावट आपोआप दूर होईल. कारण शेतकरी मरू इच्छित नाही; तो जगू इच्छितो, फक्त त्याला जगण्यासाठी आशेचा हात, योग्य दिशा आणि समाजाचा शासनाचा आधार हवा आहे. तो त्याला मिळो व शेती हा उद्योग मानून शेतीला पूरक सर्व योजना पैसा शासकीय धोरण लोकांची मानसिकता हे बदलण्याची गरज आहे व शेतकऱ्यांनी सुद्धा यातून मार्ग काढण्याकरता वरील उपाय योजना करून आपली शेती कमी खर्चाची आपल्या घरी कार्यक्रम कमी खर्चाचे करणे काळाची गरजेचे आहे. जगात काय विकले जाते ते पाऊन आपल्या शेती ते पिकवले पाहिजे. मिश्र शेतीचे प्रयोग केले पाहिजे. नुसते शासनावर अवलंबून न राहता शेतकऱ्यांनी संघटन, संघर्ष, उपाययोजना करून यावर मार्ग काढले काळाची गरज आहे. आत्महत्या करून प्रश्न सुटणार नाही तर आत्मनिर्भर होऊन यातून मार्ग निघू शकते तो काढण्याकरता जनतेने शासनाने शेतकऱ्यांनी एकत्र येऊन काम करावे ही हात जोडून नम्र विनंती.

गजानन हरणे
जिल्हा परिषद नगर, खडकी
मो.९८२२९४२६२३

## शेती उत्पादन वाढले; पण शेतकरी गरीबच का राहिला?

गेल्या काही दशकांत शेतीमध्ये आधुनिक तंत्रज्ञान मोठ्या प्रमाणावर आले. ट्रॅक्टर, हार्वेस्टर, रासायनिक खते, महागडी बियाणे, ड्रिप सिंचन, विविध कीटकनाशके यांचा वापर वाढला. शासनाने आणि कंपन्यांनी यालाच 'आधुनिक शेती' म्हणून प्रचारित केले. सुरुवातीला उत्पादन वाढले, परंतु या उत्पादन वाढीचा फायदा शेतकऱ्याला झाला नाही. कारण उत्पादन वाढले तरी उत्पादन खर्च त्याहून अधिक वाढला. पूर्वी शेतकरी आपल्या शेतातील बियाणे वापरत होता. आज त्याला हजारो रुपये खर्च करून बाजारातील हायब्रीड बियाणे विकत घ्यावी लागतात. पूर्वी शेणखत वापरले जात होते; आज रासायनिक खतांशिवाय पीक येत नाही, अशी मानसिकता निर्माण झाली आहे.

पूर्वी बैलजोडीने शेती केली जात होती. गावातील 'सांगड' पद्धतीमुळे एकमेकांच्या मदतीने कामे होत होती. त्यामुळे पैशाचा खर्च कमी आणि माणुसकीचा व्यवहार जास्त होता. आज ट्रॅक्टर, डिझेल, यंत्रसामग्री, मजुरी यावर प्रचंड खर्च होतो. एक एकर शेती करण्यासाठी हजारो रुपयांचा खर्च येतो. त्यातच निसर्गाचा लहरीपणा वाढला आहे. कधी अवकाळी पाऊस, कधी दुष्काळ, कधी गारपीट, तर कधी अतिवृष्टी. शेतकरी पिकवतो; पण शेवटी बाजारात भाव पडतो. कापूस, सोयाबीन, कांदा, टोमॅटो, डाळी यांसारख्या पिकांना उत्पादन खर्चापेक्षाही कमी भाव मिळतो. त्यामुळे 'उत्पादन वाढले तरी उत्पन्न वाढले नाही' ही दुर्दैवी परिस्थिती निर्माण झाली आहे.

# स्लीप अँड रिकव्हरी : फिटनेस प्रवासातील दुर्लक्षित पण महत्त्वाचा घटक

*आजकाल फिटनेसबाबत जागरूकता मोठ्या प्रमाणात वाढली आहे. अनेक लोक वजन कमी करण्यासाठी, स्नायू वाढवण्यासाठी, ताकद वाढवण्यासाठी किंवा निरोगी जीवनशैलीसाठी नियमित वर्कआउट करताना दिसतात. तासन्तास जिममध्ये मेहनत, योग्य डाएट प्लॅन, सप्लिमेंट्स, कार्डिओ — हे सर्व केले जाते. पण या सगळ्यामध्ये एक अत्यंत महत्त्वाचा भाग अनेकदा दुर्लक्षित राहतो — स्लीप (झोप) आणि रिकव्हरी (पुनर्बांधणी/विश्रांती प्रक्रिया). अनेकांना वाटते की जास्त वेळ जिममध्ये घालवला की चांगले परिणाम मिळतील. पण विज्ञान काही वेगळे सांगते. वर्कआउट शरीराला आव्हान देते, तर झोप आणि रिकव्हरी शरीराला मजबूत बनवतात. म्हणजेच, फिटनेसमध्ये प्रगती ही फक्त ट्रेनिंगवर नाही तर शरीर किती चांगल्या प्रकारे रिकव्हर होते यावरही अवलंबून असते.*



**स्लीप आणि रिकव्हरी म्हणजे नेमके काय?**

झोप (स्लीप) म्हणजे फक्त शरीर बंद करून विश्रांती घेणे नाही. झोपेदरम्यान शरीरात अनेक महत्त्वाच्या शारीरिक प्रक्रिया घडतात — जसे की स्नायूंची दुरुस्ती, हार्मोन्सचे संतुलन, ऊर्जा पुनर्संचयित करणे आणि मेंदूची पुनर्बांधणी.

रिकव्हरी (पुनर्बांधणी) म्हणजे वर्कआउटनंतर शरीराची पूर्वस्थितीत परत येण्याची आणि अधिक मजबूत होण्याची प्रक्रिया. यामध्ये योग्य झोप, पोषण, विश्रांती, पाण्याचे योग्य प्रमाण आणि ताण नियंत्रण यांचा समावेश होतो.

**सोप्या भाषेत सांगायचे झाले तर –**

'वर्कआउट शरीराला ताण देते, पण रिकव्हरी शरीराला मजबूत बनवते.' स्नायूंची वाढ आणि रिकव्हरीमध्ये झोपेची भूमिका

जिममध्ये ट्रेनिंग करताना आपल्या स्नायूंवर ताण येतो आणि सूक्ष्म स्तरावर मसल ब्रेकडाउन होते. अनेकांना वाटते की जिममध्येच स्नायू वाढतात, पण प्रत्यक्षात स्नायूंची वाढ वर्कआउटनंतरच्या रिकव्हरीमध्ये होते. वैज्ञानिकदृष्ट्या पाहिल्यास, गाढ झोपेदरम्यान (डीप स्लीप) शरीरात ग्रोथ हार्मोन चे प्रमाण वाढते. हा हार्मोन मसल रिपेअर, टिश्यू रिकव्हरी आणि स्नायूंच्या वाढीसाठी महत्त्वाची भूमिका बजावतो. जर झोप अपुरी असेल, तर शरीराला पुरेशी रिकव्हरी मिळत नाही आणि त्यामुळे मसल गेनची गती कमी होऊ शकते.

**फॅट लॉसमध्ये झोप का महत्त्वाची आहे?**

अनेक लोक वजन कमी करण्यासाठी कठोर डाएट आणि कार्डिओ करतात, पण झोपेकडे दुर्लक्ष करतात.

कमी झोपेमुळे शरीरातील ग्रेलिन (भूक वाढवणारा हार्मोन) वाढतो आणि लेप्टिन (पोट भरल्याचा सिग्नल देणारा हार्मोन) कमी होतो. यामुळे गोड पदार्थ, जंक फूड आणि जास्त खाण्याची इच्छा वाढू शकते. याशिवाय कमी झोपेमुळे कॉर्टिसोल (ताण निर्माण करणारा हार्मोन) वाढू शकतो, ज्याचा संबंध पोटावरील चरबी वाढण्याशी जोडला जातो. म्हणूनच फक्त डाएट आणि कार्डिओ करून उपयोग नाही — योग्य झोप फॅट लॉस अधिक प्रभावी बनवू शकते.

**ताकद, ऊर्जा आणि वर्कआउट परफॉर्मन्सवर परिणाम**

जर एखाद्या दिवशी झोप पूर्ण झाली नसेल, तर दुसऱ्या दिवशी वर्कआउटमध्ये फरक जाणवतो — ऊर्जा कमी, फोकस कमी आणि ताकदही कमी वाटते.

**संशोधनानुसार अपुरी झोप झाल्यास :**

प्रतिक्रिया देण्याची क्षमता कमी होऊ शकते, वर्कआउट परफॉर्मन्सवर परिणाम होऊ शकतो ताकद निर्माण करण्याची क्षमता कमी होऊ शकते

**थकवा आणि प्रेरणा कमी होऊ शकते.**

योग्य झोपेमुळे शरीरातील नर्व्हस सिस्टीम अधिक चांगल्या प्रकारे रिकव्हर होते, ज्यामुळे परफॉर्मन्स सुधारण्यास मदत होते. हार्मोन्सचे संतुलन राखण्यासाठी झोप आवश्यक फिटनेसशी संबंधित अनेक महत्त्वाचे हार्मोन्स झोपेवर अवलंबून असतात.

टेस्टोस्टेरॉन - स्नायूंची वाढ आणि ताकदीसाठी महत्त्वाचा

ग्रोथ हार्मोन - रिकव्हरी आणि मसल रिपेअरसाठी आवश्यक

इन्सुलिन सेन्सिटिव्हिटी - ऊर्जा वापर सुधारण्यासाठी महत्त्वाची

कॉर्टिसोल - जास्त वाढल्यास रिकव्हरी आणि फॅट लॉसवर परिणाम करू शकतो म्हणूनच योग्य झोप म्हणजे चांगले हार्मोनल वातावरण. दुखापतीचा धोका कमी करण्यासाठी रिकव्हरी का गरजेची? अनेक लोक दररोज खूप जास्त ट्रेनिंग करतात, पण शरीराला पुरेशी विश्रांती देत नाहीत. यामुळे: सतत थकवा, सांधेदुखी, दुखापतीचा धोका वर्कआउटमध्ये प्रगती थांबणे, अशा समस्या निर्माण होऊ शकतात. योग्य रिकव्हरीमध्ये रेस्ट डे, स्ट्रेचिंग, योग्य पोषण, पुरेसे पाणी आणि झोप यांचा समावेश असतो. मानसिक आरोग्य आणि प्रेरणेमध्ये झोपेची भूमिका झोपेचा परिणाम फक्त शरीरावर नाही, तर मनावरही होतो. कमी झोपेमुळे: चिडचिड वाढू शकते, तणाव वाढू शकतो, एकाग्रता कमी होऊ शकते, वर्कआउट करण्याची इच्छा कमी होऊ शकते तर योग्य झोपेमुळे मन शांत राहते, फोकस वाढतो आणि फिटनेस प्रवासात सातत्य ठेवणे सोपे होते.

**आजकाल लोकांना आवश्यक झोप का मिळत नाही?**

मोबाईल आणि स्क्रीन टाइम - झोपण्यापूर्वी सोशल मीडिया, रील्स, वेब सिरीज किंवा गेम्स पाहण्याची सवय वाढली आहे. स्क्रीनमधून येणारा ब्लू लाईट झोप नियंत्रित करणाऱ्या मेलाटोनिन हार्मोन वर परिणाम करू शकतो. मानसिक तणाव आणि जास्त विचार - कामाचा ताण, आर्थिक चिंता, नातेसंबंधातील समस्या किंवा भविष्याची चिंता यामुळे मन शांत होत नाही आणि झोप उशिरा लागते. झोपण्या आधी रात्री १० वाजता तर कधी २–३ वाजता झोपणे यामुळे शरीराचे स्लीप सायकल बिघडू शकते. रात्री उशिरा चहा, कॉफी, प्री-वर्कआउट किंवा तेलकट अन्न घेतल्याने झोपेवर परिणाम होऊ शकतो. शारीरिक हालचाल कमी असणे - पूर्ण दिवस बसून राहणे किंवा शरीराची हालचाल कमी असणे यामुळे झोपेची गुणवत्ता कमी होऊ शकते.

**झोप सुधारण्यासाठी काय करू शकतो?**

रोज ठराविक वेळेला झोपण्याची आणि उठण्याची सवय लावा, झोपण्याच्या ३०–६० मिनिटे आधी मोबाईलचा वापर कमी करा, रात्री कॅफिन टाळा, झोपण्यापूर्वी शांत वातावरण तयार करा, नियमित वर्कआउट करा, पण ओव्हरट्रेनिंग टाळा, तणाव कमी करण्यासाठी ध्यान किंवा डीप ब्रीदिंगचा वापर करा.

**किती झोप आवश्यक आहे?**

सामान्यतः बहुतेक प्रौढ व्यक्तींना ७ ते ९ तासांची गुणवत्तापूर्ण झोप आवश्यक मानली जाते. फक्त जास्त वेळ झोपणे महत्त्वाचे नाही, तर गाढ आणि शांत झोप अधिक महत्त्वाची आहे.


**निष्कर्ष :** फिटनेस म्हणजे फक्त जिममध्ये मेहनत घेणे नाही. वर्कआउट, न्यूट्रिशन, झोप आणि रिकव्हरी यांचा योग्य समतोल असेल तरच चांगले आणि टिकाऊ परिणाम मिळतात. 'तुमचे शरीर जिममध्ये तुटते, पण स्लीप आणि रिकव्हरीमध्ये मजबूत बनते.' म्हणून जर तुम्हाला फॅट लॉस, मसल गेन, ताकद आणि उत्तम फिटनेस परिणाम हवे असतील, तर स्लीप अँड रिकव्हरी ला तुमच्या फिटनेस प्रवासाचा अत्यावश्यक भाग बनवा.



गणेश अंभोरे
द फिटनेस हब
फिटनेस प्रोफेशनल अँड न्यूट्रिशनिस्ट

## दिन विशेष

## जागतिक कीर्तीचे मराठी पर्यावरण तज्ज्ञ डॉ. माधव गाडगीळ



आज जयंती

डॉ. माधव धनंजय गाडगीळ यांचा जन्म पुणे येथे २४ मे १९४२ रोजी झालारु ते जागतिक कीर्तीचे मराठी पर्यावरण शास्त्रज्ञ होते. माधव गाडगीळ यांचे शालेय शिक्षण पुण्यात झाले. पुणे, मुंबई या विद्यापीठांतून जीवशास्त्राच्या पदव्या घेऊन नंतर हार्वर्ड विद्यापीठातून मॅथेमॅटिकल इकॉलॉजी या विषयात त्यांनी पीएच.डी मिळवली. ते हार्वर्ड विद्यापीठाच्या आयबीएम संगणन केंद्राचे आणि शिवाय उपयोजित गणित शास्त्रशाखेचे फेलो होते. गाडगीळ यांच्या पत्नी सुलोचना गाडगीळ या पुण्यातील भारतीय उष्णप्रदेशीय हवामानशास्त्र संस्थेमध्ये शास्त्रज्ञपदावर होत्या.

इ.स. १९७३ ते २००४ पर्यंत माधव गाडगीळ बंगलोरच्या इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ सायन्समध्ये प्राध्यापक होते. तेथे असताना त्यांनी 'सेंटर फॉर इकॉलॉजिकल सायन्सेस'ची स्थापना केली. हार्वर्ड विद्यापीठात ते जीवशास्त्र शिकवीत असत. शिवाय अमेरिकेतील स्टॅनफर्ड आणि बर्कले विद्यापीठांचे ते पाहुणे प्राध्यापक होते. विद्यार्थ्यांमध्ये पर्यावरणाच्या संरक्षणाची जागृती निर्माण व्हावी यासाठी माधव गाडगीळ यांनी शालेय व महाविद्यालयीन विद्यार्थी आणि प्राध्यापकांच्या साहाय्याने देशातील जैवविविधतेचे सर्वेक्षण आणि संवर्धन या विषयांवर काय काय करता येईल त्याचे अभिनव प्रयोग केले आहेत. लोकसंख्येचे जीवशास्त्र, सर्वसाधारण पर्यावरण, पर्यावरण-संरक्षण, पर्यावरणाची मानवी बाजू आणि ऐतिहासिक पर्यावरण हे गाडगीळ यांचे संशोधनाचे विषय होते. जीवशास्त्र व पर्यावरण शास्त्रज्ञ, संशोधक, अध्यापक, शेतकरी, सामान्य जनता, पर्यावरणाशी संबंधित बिनसरकारी संस्था आणि राष्ट्रीय पर्यावरण धोरणे आखणारे सरकारी आणि संस्थाकीय अधिकारी यांच्याशी माधव गाडगीळ यांचा सततचा संपर्क असे.

गाडगीळ हे सह्याद्री पर्वतभागाच्या पर्यावरणीय अहवाल समितीचे (गाडगीळ कमिशनचे) अध्यक्ष होते. भारतातल्या 'पहिले जैवशास्त्रीय संरक्षित वन या कल्पनेचे ते जनक होते. हे पर्यावणाच्या शालेय पातळीवरील अभ्यासक्रम निश्चित करणाऱ्या सरकारी समितीचे अध्यक्ष होते. गाडगीळ हे मराठी आणि इंग्रजी नियतकालिकांतून सातत्याने पर्यावरणविषक लेख लिहीत असत. त्यांचे २१५हून अधिक संशोधन प्रबंध आणि सहाहून अधिक पुस्तके प्रकाशित झाली आहेत. गाडगीळ यांना अनेक सन्मान आणि पुरस्कार मिळालेले आहेत. राष्ट्रीय सल्लागार परिषदेचे सदस्य असताना २०१० ते २०१२ या कालावधीत माधव गाडगीळ यांनी आदिवासींचे नैसर्गिक संसाधनावरील हक्क, अन्नसुरक्षा कायदा व नक्षलग्रस्त भागाचा विकास यासाठी धोरणात्मक पातळीवर बहुमोल योगदान दिले.

# पहिला तापमापक बनवणारे, फॅरनहाइट या एककाचे जनक डॅनियल फॅरनहाइट

हवामानशास्त्रातील विविध परिमाणांचा उदा- हवेचा दाब, तापमान यांचा अभ्यास करताना त्यांची मोजमापे खूप अचूक असावी लागत. यासाठी इतिहासात खूप पूर्वीपासून प्रयोग सुरु होते. १५७५ साली प्रथम एक 'थर्मोस्कोप' तयार करण्यात आला. सॅंटीरिओ नावाच्या माणसानं थर्मोस्कोपला संख्येचं परिमाण बहाल केलं. पण तरी चांगला थर्मामीटर तयार करणं ही त्या काळानुसार वाटते तितकी सोपी गोष्ट नक्कीच नव्हती. पदार्थ उष्णता दिली की प्रसारण पावतात हे त्यावेळी लक्षात येऊ लागलं होत, त्याचाच वापर करून काहीतरी बनवावं अशी त्याकाळात कल्पना सुचली पण ती मूर्त स्वरूप घेऊ शकत नव्हती. कारण त्यासाठी एकसारखं छिद्र असलेली म्हणजे एकसमान व्यासाची पण अत्यंत लहान अशी काचेच्या नळीची आवश्यकता होती. त्याकाळात असली इतक्या लहान व्यासाची नळी बनवणं सोपं काम नव्हतं. शिवाय त्यावरचे तापमानाचे आकडे कसे लिहायचे याबद्दल सुद्धा अनेक वाद व्हायचे. फक्त त्या नळीवर आकडे कसे लिहायचे याबद्दल तब्बल ३५ प्रकार किंवा तऱ्हा सुचवण्यात आल्या होत्या. इतक्या ३५ प्रकारातून घ्यावी कुठली यावरून पुनः वाद पेटत असत. त्यामुळे तापमापीचा शोध एका ठिकाणी येऊन थांबला होता. यावर काही ठोस तोडगा शोधणं गरजेचं होतं. यावर प्रथम तोडगा काढला तो डॅनियल गॅब्रिएल फॅरनहाइट या विविध उपकरणं बनवत असलेल्या डच शास्त्रज्ञानं. त्यानं सर्वप्रथम अल्कोहोल वापरून १७०९ मध्ये पहिला आणि त्यानंतर १७१७ मध्ये पाऱ्याचा वापर करून दुसरा तापमापी बनवला. पण यातही एक गोची होतीच. फॅरनहाइटनं जरी हा शोध लावला असला तरी त्यावर त्यानं तापमानाचे आकडे मात्र विचित्र पद्धतीनेच लिहिले. त्याच्या तापमापीप्रमाणे बर्फ होण्याचं तापमान होतं ३२ अंश आणि पाणी उकळण्याचं तापमान होतं २१२अंश. त्याच्या या विचित्रपणाविषयीसुद्धा त्याकाळी बरीच चर्चा चाले. शेवटी १७४२ साली अँड्रेस सेल्सियस या स्वीडिश माणसानं तापमानाचे एक वेगळे मोजमाप काढले. गंमत म्हणजे त्यानेही आधी विचित्रपणाच केला होता. त्यानं पाणी उकळण्याचं तापमान त्याच्या स्केलप्रमाणे ०अंश आणि पुनः बर्फ होण्याचं तापमान १००अंश ठेवलं, मग पुनः वाद, चर्चा घडून त्याच्या मृत्यूनंतर १७४४ साली ती तापमानं उलटी केली आणि या नव्या स्केलप्रमाणे बर्फ ०अंश ला वितळू लागला आणि पाणीसुद्धा १०० अंशला व्यवस्थितपणे उकळू लागले होते. फॅरनहाईट आणि सेल्सियस यांच्या या प्रयत्नांनी हवामानशास्त्रही विकसित झालं.

पुढे १९४८ साली भरलेल्या एका जागतिक परिषदेत सेंटिग्रेड हा शब्द वगळून तापमान मोजण्याच्या एककाला सेल्सियस नाव देण्याचा निर्णय झाला.

## साहित्यिक, लेखकांना आवाहन

**दैनिक सिटी न्यूज सुपरफास्ट** आता आठ पानांसह वाचकांना उपलब्ध होत आहे. अंकातील विविधा पानासाठी अकोला शहर तसेच जिल्ह्यातील साहित्यिक, लेखक, कवी यांनी त्यांचा मजकूर **८३९०६७०९९९** या **व्हॉटसअप** क्रमांकावर पाठवावा.

त्याला यथायोग्य प्रसिद्धी दिली जाईल. या अंकातील लेखांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.

सिटी न्यूज अकोला

रविवार, दि. २४ मे २०२६

http://epaper.citynewssuperfast.com

## आदिशक्ती जीण माता मंगल पाठ

**अकोला :** श्री नवग्रह शनी मंदिर, बायपास पूल गीतानगर मध्ये अधिक मास निमित्त शनिवार २३ मे रोजी राजस्थान (सिकर) येथील कुल देवी जीण मां भवानी' चा मंगलपाठ भक्तांच्या उपस्थितीत तसेच सहकार्याने पार पडला. प्रसिद्ध भजन गायक राधेश्याम शर्मा राजपूतपूरा द्वारा भजन गायन करून उपस्थित भाविकांना भावविभोर केले. जीण मातेचा जयजयकार करण्यात आला. भाविकांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती. मंदिराचे पुजारी पं. दिनेश भंवरलाल शर्मा, राधेश्याम शर्मा यांनी सहकार्य केले.

## तारफाईल मधील २१८ कुटुंबांना हुसकावून लावण्याच्या हालचाली

### ह्यूमन राईट जस्टीस असोसिएशनचा विरोध

प्रतिनिधी २४ मे

**अकोला :** तारफाईल मधील रेल्वे लाईनलगत वास्तव्यास असलेल्या सुमारे २१८ कुटुंबांची वस्ती हटविण्याच्या हालचाली विरोधात ह्यूमन राईट जस्टीस असोसिएशन अकोला तर्फे तीव्र संताप व्यक्त करण्यात आला आहे.

या संदर्भात संघटनेचे जिल्हाध्यक्ष रवींद्र गवई यांनी मुख्यमंत्री, रेल्वेमंत्री यांच्यासह विविध प्रशासकीय अधिकाऱ्यांना निवेदन सादर करून वस्ती हटविण्याची कार्यवाही तात्काळ थांबविण्याची मागणी केली आहे. निवेदनात नमूद केले की, तारफाईल परिसरातील ही वस्ती ५० वर्षांपासून अस्तित्वात असून येथे गरीब, कष्टकरी, मजूर, वयोवृद्ध नागरिक वास्तव्यास आहेत. हा भाग शहरी क्षेत्रात मोडत असल्यामुळे रेल्वे लाईनपासून ३० मीटरपर्यंतच कारवाईचा विचार करण्यात यावा, अशी मागणी देखील करण्यात आली आहे.

सध्या राज्यात तीव्र उष्णतेची लाट असताना कोणतेही पुनर्वसन न करता अचानक वस्ती हटविल्यास नागरिकांना उघडयावर राहण्याची वेळ येऊन गंभीर मानवी संकट निर्माण होऊ शकते. तसेच महिला, लहान मुले, गर्भवती स्त्रिया व आजारी नागरिकांच्या जीवितास धोका निर्माण होण्याची शक्यता नाकारता येत नाही, असेही निवेदनात म्हटले आहे.

भारतीय संविधानाने प्रत्येक नागरिकाला अन्न, वस्त्र व निवारा हा मूलभूत अधिकार दिलेला असून पुनर्वसनाशिवाय गरीब नागरिकांना बेघर करणे अन्यायकारक व अमानवीत असल्याचे सर्वोच्च न्यायालयाने अनेक निर्णयांमध्ये स्पष्ट केले आहे. त्यामुळे शासनाने प्रथम सर्व प्रभावित कुटुंबांचे पुनर्वसन करूनच पुढील कारवाई करावी, अशी मागणी संघटनेतर्फे करण्यात आली आहे. संघटनेचे राष्ट्रीय सचिव संगपाल शिरसाठ, जिल्हा सचिव राजेश खांडेकर, संघटन सचिव प्रभाकर कवडे, सहसचिव सुरेश मोरे तसेच तारफाईल नगरातील रहिवासी संतोष चौहादे, कुणाल राऊत, चंद्रशेखर नकाशे, गजानन जावळे, विनोद डोंगरे, विनोद सहारे, नागेश शेंडे, सुधाकर लांजेवार, नंदू कोल्हटकर, बंटी खंडारे व इतर नागरिकांनी हा विषय लावून धरला आहे.

# जमकेश्वरच्या ग्रामसेवकाने लाखो रुपयांचा शासनाला लावला चुना ?

## गावकऱ्यांनी दिलेल्या अर्जानुसार पंचायत समिती कडून चौकशी सुरू

आजम खान २४ मे



**बार्शीटाकळी :** तालुक्यातील जमकेश्वरच्या ग्रामसेवकाने निधीचा गैरवापर करून शासनाला चुना लावला असा आरोप आहे. सखोल चौकशीसाठी गावकरी गोपाल चौधरी, उल्हास ठाकरे, किशोर देशमुख, शाम देशमुख, नयन ठाकरे आणि जागीर खान शेरखान यांनी पंचायत समिती कार्यालयामध्ये अर्ज दिला आहे. चौकशी सुरू झाली आहे. सत्य समोर आणावे अशी मागणी आहे.

२०२१ ते २४ या आर्थिक वर्षात जमकेश्वर ग्रामपंचायत मधून लाखो रुपयांची उलाढाल झाली. राजू ठोंबरे सरपंचपदावर असताना एमबी रजिस्टर, चेकबुक रजिस्टरवर अंगठे घेण्यात आले. नंतर दुसऱ्या चेकबुकवर त्यांची इंग्रजीमध्ये सही करून पैसे काढण्यात आले. दलित वस्तीमध्ये १८ लाख रुपयांचे रोड मंजुर केले आहे पण ते रोड कुठे गेले हा प्रश्न गावकऱ्यांना पडला आहे. गावात महागासवर्गीय, पारधी, आदिवासी लोक राहतात. या लोकांनी घरकुल करिता ग्रामसेवक, पटवारी यांच्याकडे वारंवार फाईल तयार करून दिली. पण, एकाही व्यक्तीच्या घरकुलाला मंजुरी आली नाही. गावात पिण्याचे पाणी नाही. गावामध्ये जिल्हा परिषद शाळा असून शाळेत जमकेश्वर गावातील लोकांनी चुलीत जाळण्याचे इंधन ठेवले आहे. जमकेश्वर हे गाव बार्शीटाकळी पासून ३० ते ३५ किलोमीटर अंतरावर आहे. या गावामध्ये बस सेवा नाही. येथील लोक प्रायव्हेट वाहनाने येणे जाणे करतात. इमर्जन्सी केस असल्यास ट्रॅक्टर घेऊन पिंजर येथील सरकारी दवाखाना येथे उपचार करिता भरती करण्यात येते. शासनाने या गावाकडे लक्ष देणे अत्यंत गरजेचे आहे. या ग्रामपंचायती सखोल चौकशी करून लाखो रुपयांची अनियमितता उघडकीस आणून अधिकारी व कर्मचारी यांच्याकडून पैसे वसूल करून दंडात्मक कारवाई करण्यात यावी असे जमकेश्वर वासियांचे म्हणणे आहे. चौकशी करिता बार्शीटाकळी पंचायत समितीचे सहाय्यक गट विकास अधिकारी क्षितिज मोगरेकर, कनिष्ठ अभियंता गजानन पांडे, विस्तार अधिकारी दीपक इंगळे व बार्शीटाकळीचे व्हिडिओ पवार हे जमकेश्वर ग्रामपंचायतची तपासणी करीत आहेत.

## नाईक होमिओपॅथीमध्ये होतोय असाध्य आजारांवर उपचार

### ॲडव्हान्स होमिओपॅथी रुग्णांसाठी गुणकारी




प्रतिनिधी २४ मे

**अकोला :** येथील प्रसिद्ध डॉ. नाईक होमिओपॅथीमध्ये थायरॉईड, लठ्ठपणा, ॲसिडिटी, गुडघेदुखी, कंबरदुखी, संधिवात , मायग्रेन सारख्या असाध्य आजारांवर उपचार घेऊन रुग्ण आता निरोगी जीवन जगत आहेत. अ?डव्हान्स होमिओपॅथीच्या उपचारामुळे आतापर्यंत हजारो रुग्णांना मोठा फायदा झाला आहे. गेल्या ४० वर्षांपासून डॉ. नाईक होमिओपॅथीमध्ये शरीराच्या सर्व आजारांवर संपूर्ण आणि यशस्वी उपचार केले जात आहेत. ज्या रुग्णांना इतर ठिकाणी उपचार घेऊनही फरक पडलेला नाही, अशा रुग्णांनी एकदा येथे नक्कीच भेट दिली पाहिजे.अधिक माहितीसाठी रुग्ण आणि त्यांचे नातेवाईक ९१७५९५७१२९ किंवा ९१३००१६१२९ या मोबाईल क्रमांकावर संपर्क साधू शकतात, तसेच Naikhomoeopathy.com (Youtube) वर अधिक माहिती मिळवू शकतात. येथे उपचार घेऊन पूर्णपणे बऱ्या झालेल्या एका महिला रुग्णाने आपला अनुभव व्यक्त केला आहे.

मी स्मिता, मुर्तिजापूर येथे राहते. मी नाईक होमिओपॅथी येथे उपचार घेण्यापुर्वी मला चेस्ट मध्ये फायब्रॉईड आणि थायरॉईड,होता. शरीरावर सुज आली होती. शरीर भारी वाटायच, पाय दुखायचे, आळस वाढला होता. नाईक होमिओपॅथी मध्ये १ महिन्याच्या उपचारानंतर मला खुप आराम मिळाला. म्हणून मी नाईक होमिओपॅथी मध्ये १ वर्ष झाले उपचार करित आहे.

## हिवरखेड पोलिसांनी केली गोमांसासह आरोपीस अटक



प्रतिनिधी २४ मे

**हिवरखेड :** गोर्धा बेलखेड कॅनल मार्गावर रविवारी सकाळी पोलिसांना गोपनीय माहिती मिळताच या मार्गावर अवैध गोमांस घेऊन जाणाऱ्या आरोपीस पाठलाग करून रंगेहाथ अटक केली. आरोपी शेख वसीम शेख रफिक वय (३४) वर्षे रा. बेलखेड याच्या जवळून ५० किलो गोमांस किंमत १० हजार रुपये एक होंडा शाईन किंमत ६० हजार रुपये असा ७० हजार रुपयांचा मुद्देमाल पोलिसांनी जप्त केला. आरोपीविरुद्ध प्राणी संरक्षण कायद्या अतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला. सदरची कारवाई ठाणेदार गजानन राठोड यांच्या मार्गदर्शनाखाली पीएसआय गोपाल गिलबिले, प्रमोद चव्हाण, योगेश इंगळे, आशिष साबळे दानापूर बीट जमादार यांनी केली. जप्त गोमांस पोलिसांनी खड्डयात पुरले.

## गोवंश हत्येबाबत कठोर कारवाईबाबत विश्व हिंदू परिषद-बजरंग दलाचे पोलिस प्रशासनाला निवेदन

प्रतिनिधी २४ मे



**अकोट :** अकोट तालुक्यात व शहरात नियमितपणे होत असलेल्या कथित गोवंश हत्या प्रकरणांवर कठोर कारवाई करण्यात यावी तसेच आगामी बकरी ईदच्या पार्श्वभूमीवर कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी विशेष प्रतिबंधात्मक उपाययोजना राबवाव्यात, अशी मागणी विश्व हिंदू परिषद व बजरंग दल, आकोट प्रखंडाच्या वतीने करण्यात आली आहे.

यासंदर्भात पोलीस उपविभागीय अधिकारी, अकोट यांना निवेदन देण्यात आले. निवेदनात महाराष्ट्र प्राणी संरक्षण अधिनियम, प्राण्यांवरील क्रूरता प्रतिबंधक अधिनियम तसेच सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयांचा उल्लेख करत गोवंश संरक्षणाची आवश्यकता अधोरेखित करण्यात आली आहे. संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी गोवंश हत्या ही केवळ कायद्याचे उल्लंघन नसून सामाजिक सलोखा बिघडविण्याचा प्रयत्न असल्याचा आरोप केला. अशा घटनांमुळे धार्मिक भावना दुखावून कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होण्याची शक्यता असल्याने प्रशासनाने संवेदनशीलतेने कठोर कारवाई करावी, अशी मागणी निवेदनातून करण्यात आली. तसेच गोवंश वाहतूक, खरेदी-विक्री आणि इअर टॅगिंग नियमांची काटेकोर अंमलबजावणी करावी, संशयित ठिकाणी तपासणी मोहीम राबवावी व बकरी ईदच्या काळात विशेष पोलिस बंदोबस्त ठेवावा, अशी मागणीही करण्यात आली आहे. या निवेदनावर मनोज साखरे, आनंद डिक्कर, विजय चंदन, विजय कुलट, मनीष इटनारे आणि डॉ. दिनेश नागमते आदी पदाधिकाऱ्यांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

## वेदांतच्या पाठीवर कौतुकाची थाप



प्रतिनिधी २४ मे

**अकोट :** अकोट तालुक्यातील सातपुड्यात वसलेलं ग्राम सुकळी या छोट्याशा गावांमधील वेदांत गंगाधर गावंडे या विद्यार्थ्याने विज्ञान शाखेत ८८ टक्के गुण मिळवून तालुक्यातील ग्रामीण भागामधून भरारी मारली आहे.

बारावी निकालांमधून श्री नरसिंग महाविद्यालय अकोटचा विद्यार्थी वेदांत गंगाधर गावंडे याने विज्ञान शाखेमधून ८८ट टक्के गुण मिळवले. तेही कुठलाही कोचिंग क्लास न लावता मॅथेमॅटिक्स मध्ये १०० पैकी ९६ गुण तर बायलॉजी विषयामध्ये १०० पैकी ९४ गुण मिळवत त्याने दाखवून दिले की, आपल्या गरीब परिस्थितीचे जाणीव ठेवल्यास, चिकाटीने व जिद्दीने अभ्यास केल्यास चांगल्या प्रकारे यशस्वी होऊ शकतो. व त्याने ते सिद्ध करून दाखविले त्याबद्दल त्याचे सर्वत्र कौतुक,अभिनंदन होत आहे.

वेदांत हा विद्यार्थी यशस्वी होण्याचे श्रेय आपले आई-वडील, श्री नरसिंग महाविद्यालयाचे शिक्षक व कर्मचारी यांना देतो.

## कौटुंबिक वादातून बेपत्ता झालेल्या ४८ वर्षीय व्यक्तीची गळफास लावून आत्महत्या

प्रतिनिधी २४ मे



**मुर्तिजापूर :** घरगुती किरकोळ वादातून चार दिवसांपूर्वी कोणालाही न सांगता घरातून निघून गेलेल्या एका ४८ वर्षीय व्यक्तीने झाडाला गळफास लावून आत्महत्या केल्याची धक्कादायक घटना मुर्तिजापूर शहरात उघडकीस आली आहे. प्रवीण पंजाबराव वानखडे वय ४८, रा. श्रीराम नगर, दर्यापूर रोड, मुर्तीजापूर असे मृत व्यक्तीचे नाव आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, मृत प्रवीण वानखडे यांचा काही दिवसांपूर्वी घरात किरकोळ वाद झाला होता. त्यानंतर दि. १९ मे २०२६ रोजी सकाळी ८ वाजेच्या सुमारास ते घरातून कोणालाही काहीही न सांगता निघून गेले होते. वानखडे कुटुंबियांनी त्यांचा सर्वत्र शोध घेतला, मात्र त्यांचा कुठेही पत्ता लागला नाही. शनिवार, दि. २३ मे रोजी सकाळी ९ ते ९.३० च्या दरम्यान मृत प्रवीण यांचे वडील पंजाबराव वानखडे हे त्यांचा शोध घेत असताना, दर्यापूर रोडवरील कृषी विभाग कार्यालयाजवळ असलेल्या रोपवाटिकेमध्ये त्यांना प्रवीण यांचा मृतदेह आढळून आला. प्रवीण यांनी तेथील एका लिंबाच्या झाडाला दुपट्ट्याच्या सहाय्याने गळफास घेतलेला होता. या घटनेची माहिती मृताचा मुलगा विनित प्रविण वानखडे (वय १९) याने मुर्तीजापूर शहर पोलीस ठाण्यात दिली. मुलाच्या जबानी रिपोर्टवरून मुर्तिजापूर शहर पोलिसांनी मर्ग नं. २३/२०२६ कलम 194 BNSS अन्वये नोंद करून तपास सुरू केला आहे. स्टेशन डायरी अंमलदार हायकोर्ट २७० मातकर यांनी आदेशान्वये पुढील प्रक्रिया केली असून, मृतदेह ताब्यात घेऊन पुढील कार्यवाहीसाठी पोलीस कॉन्स्टेबल १७७४ श्याम यांच्याकडे सुपूर्द करण्यात आला आहे. पुढील तपास मूर्तिजापूर शहर पोलीस स्टेशनचे ठाणेदार अजीत जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली सहायक पोलिस निरीक्षक गजानन थाटे व पोलीस हवालदार मातकर करत आहेत.

## प्लास्टिक विरोधात नगरपरिषदेचा बडगा; तीन व्यावसायिकांना दंड

**अकोट :** शहर स्वच्छ, सुंदर आणि प्रदूषणमुक्त ठेवण्याच्या उद्देशाने अकोट नगरपरिषदेने प्लास्टिक वापर तसेच सार्वजनिक ठिकाणी अस्वच्छता करणाऱ्यांविरोधात धडक कारवाई सुरू केली आहे. मुख्याधिकारी शशिकांत बाबर यांच्या मार्गदर्शनाखाली गुरुवारी (दि. २१ मे ) नगरपरिषदेच्या पथकाने शहरातील विविध भागांत तपासणी मोहीम राबवत दंडात्मक कारवाई केली.

या मोहिमेदरम्यान बंदी असलेल्या प्लास्टिक पिशव्यांचा वापर करताना आढळलेल्या शहरातील तीन व्यावसायिकांविरोधात कारवाई करण्यात आली. संबंधित प्रत्येक व्यावसायिकाला प्रत्येकी पाच हजार रुपयांचा दंड ठोठावण्यात आला. तसेच सार्वजनिक ठिकाणी घाण करून अस्वच्छता पसरविणाऱ्या नऊ नागरिकांविरोधातही दंडात्मक कारवाई करण्यात आली.

नगरपरिषदेच्या या मोहिमेमुळे शहरातील व्यापारी व नागरिकांमध्ये स्वच्छतेबाबत जागरूकता निर्माण होत असून, सार्वजनिक आरोग्य व पर्यावरण संरक्षणासाठी प्रशासनाने कठोर पावले उचलल्याचे दिसून येत आहे. प्लास्टिकमुळे पर्यावरणाला होणारा धोका लक्षात घेता अशा कारवाया सातत्याने सुरू ठेवण्यात येणार असल्याचे नगरपरिषद प्रशासनाकडून सांगण्यात आले.

# जनधन खात्यातून पैसे कपातीचा स्टेट बँकेचा अजब फंडा ?

प्रतिनिधी २४ मे

**हिवरखेड :** स्टेट बँकेच्या हिवरखेड शाखेत गोरगरीब जनतेच्या अनेक जनधन बँक खात्यांमधून, खातेदारांच्या संमतीशिवाय किंवा पूर्वपरवानगी शिवाय प्रधानमंत्री जीवन ज्योती विमा योजना अंतर्गत ४३६ आणि प्रधानमंत्री सुरक्षा विमा योजना अंतर्गत २० इतकी रक्कम कपात केली जात असल्याचा धक्कादायक आरोप ग्राहक आणि जागरूक नागरिकांकडून केला जात असल्याने आणि संबंधित अधिकारी उडवा उडवीची उत्तरे देत असल्याने प्रश्न उपस्थित होत आहे.

योजनेच्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार, PMJJBY आणि PMSBY मध्ये नावनोंदणी करण्यासाठी, तसेच 'ऑटो-डेबिट' (खात्यातून आपोआप रक्कम वजा होण्याची) सुविधेसाठी खातेदाराची संमती आणि अधिकृत परवानगी असणे आवश्यक असते. परंतु स्टेट बँकेचे मोलमजुरी करणारे ग्राहक रहमान खान बिस्मिल्ला खान यांच्या कुटुंबियांचे ४ जनधन खाते असून विमा योजनेसाठी कोणताही अर्ज न करता चारही खात्यातून विमा योजनेच्या रक्कम कपात करण्यासाठी खात्यात पैसे भरण्यासाठी मेसेज येत असल्यामुळे त्यांना या अफलातून वसुलीची कुणकुण लागली आणि त्यांनी आम्ही विमा योजनेसाठी कोणताही अर्ज केलेला नसून आम्हाला योजना नको असून कृपया आमच्या सर्व खात्यातून कोणतीही कपात करू नये असा पूर्वसूचना अर्ज करूनही जाणीवपूर्वक त्यांच्या खात्यातून कपात केल्याचा आरोप त्यांनी केला असून हा प्रकार फक्त त्यांच्यासोबत घडला नसून तक्रार कर्ते डॉ. वाजीद अली आणि ॲड. धनंजय गावंडे यांनी स्टेट बँकेचे शाखा प्रबंधक मनोज चौहान यांच्याशी चर्चा करत असताना प्रबंधकांनी त्यांना धक्कादायक माहिती दिली की जेवढे ही जनधन बँक खाते आहेत त्या सर्वांना ही योजना पूर्वीपासूनच लागू करण्यात आली आहे.

त्यावर तक्रारदारांनी ग्राहकांच्या संमतीचा मुद्दा उचलला असता बँक मॅनेजर ने उडवा उडवीची उत्तरे देऊन योजना ग्राहकांसाठी कशी फायद्याची आहे याची गाथा सुरु केली. त्यामुळे हिवरखेड येथील तक्रारकर्त्यांनी बँकेला अनेक मुद्द्यांबाबत लेखी स्पष्टीकरण मागितले आहे. ज्यामध्ये खालील मुदयांचा समावेश आहे. खातेदारांच्या संमतीशिवाय PMJJBY आणि PMSBY चे हप्ते कपात करण्यास परवानगी देणारे कोणतेही शासकीय किंवा RBI चे परिपत्रक आपल्या शाखेला प्राप्त झाले आहे का? जर असे एखादे परिपत्रक अस्तित्वात असेल, तर कृपया जनहितार्थ माहितीसाठी त्याची एक प्रत उपलब्ध करून द्यावी. जर असे कोणतेही परिपत्रक अस्तित्वात नसेल, तर कृपया स्पष्ट करा की, कोणत्या अधिकाराखाली या कपाती केल्या जात आहेत.

> 'खातेदारांच्या स्पष्ट संमतीशिवाय त्यांच्या खात्यांतून इश्व्ॅ्भ्आणि इश्एँभ्चे हप्ते (प्रीमियम) वजा करणे, हा त्यांच्या अधिकारांचे उल्लंघन करणारा प्रकार आहे. जर संबंधित बँक प्रशासनाने या संदर्भात त्वरित स्पष्टीकरण दिले नाही आणि दोषींवर कारवाई केली नाही, तर जनहितार्थ आंदोलन छेडले जाईल.'
>
> **ॲड. धनंजय गावंडे,** हिवरखेड

> जनधन बँक खात्यांना प्रधानमंत्री विमा योजना मी रुजू होण्याच्या आधीपासूनच सुरू करण्यात आलेली आहे. संमतीशिवाय हप्ते कापल्या जात असतील तर ग्राहकांनी लेखी तक्रार करावी सदर तक्रारी आम्ही वरिष्ठांना पाठवून रक्कम खातेदाराच्या खात्यात परत जमा करायला लावू.
>
> **मनोज चौहान,** शाखा प्रबंधक

> कपाती नेमक्या कोणत्या आधारावर करण्यात आल्या, याविषयी बँक प्रशासनाने स्पष्टीकरण देणे गरजेचे आहे.
>
> हा जनतेचा पैसा आहे आणि जनतेच्या संमतीशिवाय केलेली कोणतीही कपात कदापि उचित मानली जाऊ शकत नाही.
>
> **डॉ. वाजिद अली,** हिवरखेड



सिटी न्यूज सुपरफास्ट यवतमाळ
रविवार, दि. २४ मे २०२६
https://epaper.citynewssuperfast.com

सुकळीत तणाव; जिल्हा पोलीस अधिक्षकांची भेट

# जनावर तस्करी ; पाठलाग करणाऱ्या तरुणाचा दगडफेकीत मृत्यू

प्रतिनिधी २४ मे

**महागाव :** बकरी ईदच्या पार्श्वभूमीवर अवैध जनावर वाहतुकीच्या संशयावरून सुरू झालेला पाठलाग शनिवारी मध्यरात्री रक्तरंजित वळणावर जाऊन थांबला. महागाव–उमरखेड मार्गावरील सुकळी परिसरात झालेल्या दगडफेकीत एका तरुणाचा मृत्यू झाल्याने संपूर्ण परिसर हादरला असून पोलिस प्रशासनाविरोधात तीव्र संताप व्यक्त होत आहे. गजानन मारोती सुरोशे वय ३० रा. वडद ता. महागाव असे मृतकाचे नाव आहे. मिळालेल्या माहितीनुसार, एमएच २९ बीई ८९१५ क्रमांकाच्या पिकअप वाहनातून मोठ्या प्रमाणात जनावरांची अवैध वाहतूक होत असल्याची माहिती काही बजरंग



दल कार्यकर्त्यांना मिळाली होती. हे वाहन आर्णी–महागाव मार्गे बिजोरा टोलनाका पार करून उमरखेडच्या दिशेने जात असल्याचे समजताच काही युवकांनी त्याचा पाठलाग सुरू केला. सुकळी गावाजवळील एका मोकळ्या जागेत संशयित पिकअप अचानक थांबवण्यात आले. त्यानंतर वाहनातील व्यक्तींनी पाठलाग करणाऱ्यांवर जोरदार दगडफेक केल्याचा आरोप आहे. या हल्ल्यात गजानन मारुती सुरोशे यांच्या एमएच १२ पीटी ८६३४ क्रमांकाच्या एस-क्रॉस वाहनाचे मोठे नुकसान झाले. गंभीर जखमी झालेल्या सुरोशे यांना तातडीने नांदेड येथे हलविण्यात आले; मात्र डॉक्टरांनी त्यांना मृत घोषित केले. घटनेनंतर महागाव तालुक्यात संतापाची लाट उसळली आहे. वडदसह काही गावांत रविवारी सकाळपासून बंद पाळण्यात आल्याची माहिती समोर आली. सुकळी परिसरात तणावपूर्ण शांतता असून मोठा पोलिस बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे. घटनेची माहिती मिळताच जिल्हा पोलीस अधीक्षक कुमार चिंता यांनी मध्यरात्री घटनास्थळी धाव घेतली. उमरखेडचे उपविभागीय पोलीस अधिकारी हनुमंत गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली तपास सुरू असून दोन संशयितांना अटक करण्यात आल्याची माहिती पोलिसांनी दिली. इतर आरोपींचा शोध सुरू आहे. दरम्यान, बकरी ईदच्या पार्श्वभूमीवर अवैध जनावर वाहतूक रोखण्यासाठी आवश्यक ती नाकाबंदी प्रभावीपणे उभारण्यात आली नव्हती, असा आरोप नागरिकांकडून होत आहे. धनोडा आणि भोसा परिसरात काटेकोर तपासणी झाली असती, तर संशयित वाहन सुरुवातीलाच अडविता आले असते आणि ही घटना टाळता आली असती, अशी






संतप्त प्रतिक्रिया नागरिकांनी व्यक्त केली. एका तरुणाचा मृत्यू, अवैध जनावर वाहतुकीचे आरोप आणि पोलिसांच्या कथित हलगर्जीपणामुळे जिल्ह्यात वातावरण चिघळले असून प्रशासन आता बचावाच्या भूमिकेत गेल्याची चर्चा सुरू आहे.

# गोधनी मार्गावरील अतिक्रमणावर जेसीबी



प्रतिनिधी २४ मे

**यवतमाळ :** शहरातील वाहतुकीला अडथळा ठरणाऱ्या अतिक्रमणांविरोधात नगर परिषदेने मोहीम तीव्र केली असून, शुक्रवारी (ता. २२) गोधनी मार्गावर धडक कारवाई करण्यात आली. या वेळी रस्त्याच्या दुतर्फा असलेली तब्बल ४६ दुकाने व टपऱ्या जेसीबीच्या साहाय्याने हटविण्यात आल्या. कारवाईनंतर गोधनी मार्ग काही प्रमाणात मोकळा झाल्याचे चित्र दिसून आले.

नगर परिषदेच्या अतिक्रमण हटाव पथकाने सकाळी जेसीबी, ट्रॅक्टर व मजुरांसह गोधनी मार्गावर कारवाई सुरू केली. अचानक सुरू झालेल्या मोहिमेमुळे अतिक्रमणधारकांमध्ये एकच खळबळ उडाली. काही दुकानदारांनी स्वतःहून साहित्य हटवण्यास सुरुवात केली; तर काहींनी कारवाईला विरोध दर्शविला. कायदा व सुव्यवस्था अबाधित राहावी यासाठी मोठा पोलिस बंदोबस्त तैनात करण्यात आला होता. दरम्यान, या कारवाईवरून



नगर परिषदेचे मुख्याधिकारी शुभम कॅंथमवार यांच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह उपस्थित करण्यात येत आहे. अतिक्रमण हटविताना दुजाभाव करण्यात आल्याचा आरोप अनेक व्यावसायिकांनी केला आहे. वाहतुकीस प्रत्यक्ष अडथळा निर्माण करणाऱ्या काही पक्क्या बांधकामांवर कारवाई टाळण्यात आली; मात्र फुटपाथवर छोट्या व्यवसायातून उदरनिर्वाह करणाऱ्या गोरगरीब, अपंग, विधवा व वृद्ध व्यावसायिकांची दुकाने हटविण्यात आल्याची नाराजी व्यक्त होत आहे. काही व्यावसायिकांनी, "स्वतःहून साहित्य काढत असतानाही वेळ न देता जेसीबी चालविण्यात आली," असा आरोप केला. या कारवाईत लाखोंचे नुकसान झाल्याचा दावाही बाधितांनी केला आहे. अनेकांचे व्यवसाय पूर्णपणे उद्ध्वस्त झाल्याने नव्याने व्यवसाय उभारण्याचे मोठे आव्हान त्यांच्यासमोर निर्माण झाले आहे. याशिवाय, रस्त्यालगत असलेली काही पक्की अतिक्रमणे आणि स्ट्रीट लाईटच्या खांबांवरील होर्डिंग्ज कायम ठेवण्यात आल्याने प्रशासनाच्या भूमिकेबाबत प्रश्न उपस्थित होत आहेत. अतिक्रमण हटाव मोहीम पारदर्शक पद्धतीने राबवावी आणि गोरगरिबांचे नुकसान टाळावे, अशी मागणी नागरिकांकडून करण्यात येत आहे.

# देऊरवाडीतील बुजलेली नाली अखेर मोकळी

प्रतिनिधी २४ मे

**आर्णी :** शहरातील देऊरवाडी परिसरातील प्रभाग क्रमांक १ मध्ये रफिकभाई यांच्या घराजवळील नाली दीर्घकाळापासून बुजलेली असल्याने नागरिकांना मोठ्या समस्यांना सामोरे जावे लागत होते. विशेषतः मान्सूनपूर्व काळात पावसाचे पाणी साचत असल्याने ये-जा करणे कठीण झाले होते.



स्थानिक नागरिकांनी याबाबत तक्रार मांडल्यानंतर आर्णी नगर परिषदेच्या नगरसेविका तथा पाणीपुरवठा सभापती छबुताई मनोज चारोडे यांनी तातडीने दखल घेतली. त्यांच्या पुढाकारातून जेसीबीच्या साहाय्याने बुजलेली नाली साफ करून कच्च्या नालीचे काम हाती घेण्यात आले. या कामावेळी मनोज चारोडे यांनी स्वतः उपस्थित राहून कामाची पाहणी केली व सफाईचे काम पूर्णत्वास नेले. त्यामुळे परिसरातील साचलेल्या पाण्याचा प्रश्न मार्गी लागण्यास मदत झाली आहे.

दरम्यान, वेळेत कारवाई झाल्याने देऊरवाडीतील नागरिकांनी समाधान व्यक्त करत नगरपरिषद प्रशासनाचे आभार मानले.

# महागावात पाणीटंचाई तीव्र ; नागरिक हैराण

प्रतिनिधी २४ मे

**महागाव :** उन्हाळ्याची तीव्रता वाढत असताना महागाव नगरपंचायतीच्या प्रभाग क्रमांक १२ व १३ मध्ये गंभीर पाणीटंचाई निर्माण झाली आहे. गेल्या जवळपास महिनाभरापासून मोटार पंप बंद असल्याने नागरिकांना पिण्याच्या पाण्यासाठी मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत असून नगरपंचायत प्रशासनाविरोधात संताप व्यक्त होत आहे. या पार्श्वभूमीवर नगरसेवक तथा शहर काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष शैलेश कोपरकर यांनी नगरपंचायत प्रशासनावर निष्क्रियतेचा आरोप केला आहे. वारंवार तक्रारी करूनही प्रशासनाने प्रश्न गांभीर्याने घेतला नसल्याचा दावा त्यांनी केला.



प्रभागातील अनेक भागांत नळांना पाणी येत नसल्याने महिलांना व ज्येष्ठ नागरिकांना दूरवरून पाणी आणावे लागत आहे. काही कुटुंबांना खासगी टॅंकरद्वारे पाणी विकत घ्यावे लागत असल्याने अतिरिक्त आर्थिक भार सहन करावा लागत असल्याची माहिती स्थानिकांनी दिली. "प्रभाग क्रमांक १२ व १३ मधील मोटार पंप गेल्या महिनाभरापासून बंद आहे. याबाबत प्रशासनाला अनेकदा माहिती देण्यात आली; मात्र अधिकाऱ्यांनी जाणीवपूर्वक दुर्लक्ष केले," असा आरोप शैलेश कोपरकर यांनी केला. नागरिकांच्या मूलभूत प्रश्नांकडे दुर्लक्ष करून राजकीय हेतूने कामे रखडविली जात असल्याचाही दावा त्यांनी केला.

वाढत्या तापमानाच्या पार्श्वभूमीवर पाण्याची मागणी वाढलेली असताना प्रशासनाने तातडीने उपाययोजना करणे अपेक्षित होते.

मात्र दुरुस्तीचे काम अद्यापही पूर्ण झाले नसल्याने संपूर्ण परिसरातील पाणीपुरवठा विस्कळीत झाला आहे. काही भागांत स्वच्छतेचे प्रश्नही निर्माण होत असल्याची तक्रार नागरिकांनी केली. दरम्यान, प्रशासनाने तातडीने मोटार पंप दुरुस्त करून नियमित पाणीपुरवठा सुरू करावा, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे. अन्यथा नागरिकांना सोबत घेऊन तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा शैलेश कोपरकर यांनी दिला.

# विधानपरिषद निवडणुकीसाठी जिल्हास्तरिय नोडल अधिकाऱ्यांची नियुक्ती

प्रतिनिधी २४ मे

**यवतमाळ :** महाराष्ट्र विधानपरिषदेच्या स्थानिक प्राधिकारी मतदारसंघाच्या द्विवार्षिक निवडणूक २०२६ च्या पार्श्वभूमीवर निवडणूक प्रक्रिया सुरळीत, पारदर्शक आणि शांततेत पार पाडण्यासाठी जिल्हाधिकारी तथा निवडणूक निर्णय अधिकारी विकास मीना यांनी जिल्हास्तरिय नोडल अधिकाऱ्यांची नियुक्ती केली आहे.

भारत निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार निवडणूक प्रक्रियेतील विविध समस्यांचे तातडीने निराकरण करण्यासाठी तसेच निवडणूक व्यवस्थापन अधिक प्रभावी करण्यासाठी ही नियुक्ती करण्यात आली आहे. आदर्श आचारसंहितेच्या अंमलबजावणी व कायदा व सुव्यवस्था नोडल अधिकारी म्हणून निवासी उपजिल्हाधिकारी अनिरुद्ध बक्षी व अपर पोलीस अधीक्षक अशोक थोरात यांची नियुक्ती करण्यात आली आहे. मनुष्यबळ व्यवस्थापन, संगणकीकरण व मतदान,मतमोजणी कर्मचाऱ्यांच्या नोडल अधिकारी म्हणून तहसीलदार राहुल मोरे, तर प्रशिक्षण व्यवस्थापनासाठी उपजिल्हाधिकारी अजितकुमार येळे यांची नोडल अधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे.

# उमरखेड खरेदी-विक्री संघात ज्वारी खरेदीचा शुभारंभ



प्रतिनिधी २४ मे

**उमरखेड :** तालुक्यातील प्रमुख पीक असलेल्या ज्वारीला हमीभाव मिळावा, या उद्देशाने उमरखेड खरेदी-विक्री संघाच्या वतीने (दि. २२ मे) ज्वारी खरेदी केंद्राचा शुभारंभ करण्यात आला. यंदा ज्वारीला प्रतिक्विंटल ३६९९ रुपये हमीभाव जाहीर करण्यात आला आहे.

ज्वारी हे तालुक्यातील शेतकऱ्यांचे महत्त्वाचे पीक मानले जाते. चविष्ट, रुचकर तसेच पचनास हलके असल्याने ज्वारीची मागणी वाढत असून शेतकऱ्यांना योग्य दर मिळण्यासाठी शासनाच्या हमीभाव योजनेअंतर्गत खरेदी प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. याप्रसंगी संघाचे अध्यक्ष सुदर्शन रावते, उपाध्यक्ष गणेशराव नरवाडे, शुभाषराव शिंदे, विजय हनवते, शंकरराव शिंदे, तानाजी चंद्रवंशी, सुधाकर लाहेवार, गणपत नलावडे, शेतकरी संतोष शिंदे, माधव पिलंवड तसेच सचिव विजय माने उपस्थित होते. उपस्थितांनी शेतकऱ्यांनी जास्तीत जास्त प्रमाणात ज्वारी विक्रीसाठी नोंदणी करण्याचे आवाहन केले.

# पुसदमध्ये बनावट नोटांचा कारखाना उद्ध्वस्त

## तेलंगणातील चौघांना अटक; दोन लाखांचा मुद्देमाल जप्त

प्रतिनिधी २४ मे

**पुसद :** शहरातील विहार लॉजमध्ये सुरू असलेला बनावट नोटांचा कारखाना पुसद शहर पोलिसांनी उधळून लावला. गोपनीय माहितीच्या आधारे टाकलेल्या मध्यरात्रीच्या छाप्यात तेलंगणातील चौघांना अटक करण्यात आली असून, बनावट नोटा तयार करण्याचे साहित्य, मोबाईल फोन आणि वाहने असा २ लाख ८८० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

सुरेश किशन पेंद्राम (४०), अन्वेश ऊर्फ अविनाश कुमार सुरेंदर मालराज (३७), व्यंकटेश किशन जंगली (वय ३३) आणि सैय्यद साजीद सैय्यद खाजा (३५) रा. मंचेरियाल तेलंगणा अशी आरोपींची नावे आहे. २० मे रोजी रात्री साडेबारा वाजण्याच्या सुमारास विहार



लॉजमधील एका खोलीत काही जण नकली नोटा तयार करत असल्याची माहिती पोलिसांना मिळाली होती. त्यानंतर पुसद शहर पोलीस आणि उपविभागीय पोलीस अधिकारी कार्यालयाच्या पथकाने संयुक्त कारवाई करत संबंधित खोलीवर धाड टाकली.या कारवाईत ५०० रुपयांच्या ११ बनावट नोटा आणि रासायनिक प्रक्रिया केलेली आणखी एक ५०० रुपयांची नोट हस्तगत करण्यात आली. तसेच नोटा तयार करण्यासाठी वापरले जाणारे साहित्य, मोबाईल फोन आणि गुन्ह्यात वापरलेली वाहने पोलिसांनी जप्त केली.या प्रकरणी सुरेश किशन पेंद्राम (४०), अन्वेश ऊर्फ अविनाश कुमार सुरेंदर मालराज (३७), व्यंकटेश किशन जंगली (३३) आणि सैय्यद साजीद सैय्यद खाजा (३५) या तेलंगणातील मंचेरियाल जिल्ह्यातील रहिवाशांना अटक करण्यात आली आहे. आरोपींविरुद्ध भारतीय न्याय संहितेच्या विविध कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.पोलीस अधीक्षक कुमार चिंता, अपर पोलीस अधीक्षक अशोक थोरात, सहाय्यक पोलीस अधीक्षक हर्षवर्धन बी. जे. आणि पोलीस निरीक्षक सेवानंद वानखडे यांच्या मार्गदर्शनाखाली ही कारवाई करण्यात आली. पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक अक्षय सनगर करीत आहेत.

# पुसद-हरदडा रस्त्याच्या कामात ठेकेदाराची मनमानी

## नागरिक त्रस्त, वृक्षतोडीवरही प्रश्नचिन्ह

प्रतिनिधी २४ मे

**उमरखेड :** अनेक वर्षांपासून प्रतीक्षेत असलेल्या पुसद-हरदडा रस्त्याच्या कामाला अखेर मंजुरी मिळाली खरी; मात्र कोट्यवधी रुपयांच्या या प्रकल्पात ठेकेदाराच्या मनमानीमुळे नागरिकांचा संताप वाढत आहे. गेल्या तीन वर्षांपासून अत्यंत संथ गतीने सुरू असलेल्या या कामामुळे वाहनचालक व प्रवाशांना मोठा त्रास सहन करावा लागत असून कामाच्या गुणवत्तेबाबतही गंभीर प्रश्न उपस्थित होत आहेत.

रस्त्याचे काम कुठल्याही एका टप्प्यात पूर्ण झालेले नसून निवडणुका किंवा आंदोलने झाली की ठेकेदार आपल्या सोयीने कामाची दिशा बदलत असल्याची नागरिकांची तक्रार आहे. उमरखेड शहरापासून




महाविद्यालय परिसरापर्यंतचा रस्ता अत्यंत खराब अवस्थेत असून हरदडा ते क्रेशरपर्यंतचा मार्गही दयनीय स्थितीत आहे. त्यामुळे दररोज या मार्गावरून प्रवास करणाऱ्या नागरिकांची अक्षरशः दमछाक होत आहे.

दरम्यान, रस्त्याच्या मध्यभागातील तसेच काही ठिकाणी क्षेत्राबाहेरील मोठ्या वृक्षांची तोड मोठ्या प्रमाणावर सुरू असल्याचे दिसून येत आहे. दोन वर्षांपूर्वी कॉलेज ते विठ्ठल मार्गावर उभ्या असलेल्या वृक्षांची अचानक घाईगडबडीत तोड सुरू झाल्याने नागरिकांनी आश्चर्य व्यक्त केले आहे.

### प्रभारी अधिकाऱ्यांशी संपर्क होऊ शकला नाही

■ या संदर्भात रस्त्याचे प्रभारी अधिकारी संजय मानापुरे यांच्याशी संपर्क साधण्याचा प्रयत्न करण्यात आला. मात्र त्यांचा भ्रमणध्वनी बंद असल्याने त्यांची प्रतिक्रिया मिळू शकली नाही. त्यामुळे हा रस्ता नेमका कधी पूर्ण होणार, कामाची गुणवत्ता काय आहे आणि नागरिकांना आणखी किती दिवस त्रास सहन करावा लागणार, असे प्रश्न उपस्थित होत आहेत.

वृक्षतोडीचा ठेका कोणाला देण्यात आला, कोणत्या निकषांवर देण्यात आला, याबाबत विचारणा केल्यास संबंधितांकडून समाधानकारक उत्तर मिळत नसल्याची तक्रार स्थानिकांनी केली.

सध्या काही ठिकाणी केवळ २०० ते ४०० मीटरपर्यंत एकपदरी रस्ता तयार करण्यात आला आहे. या अरुंद रस्त्यावरून एकावेळी दोन मोठी वाहने जाऊ शकत नसल्याने अपघाताचा धोका वाढला आहे. एवढे मोठे बजेट असताना कामाची अशी अवस्था का, असा सवाल प्रवासी उपस्थित करीत आहेत.

कामाच्या ठिकाणी कोणतेही प्रभावी नियंत्रण नसल्याची भावना नागरिकांमध्ये असून लोकप्रतिनिधींकडूनही या प्रश्नाकडे दुर्लक्ष होत असल्याचा आरोप केला जात आहे. पावसाळ्यापूर्वी रस्त्याचे काम पूर्ण होईल की नाही, याबाबतही साशंकता व्यक्त होत आहे.

# शेतकऱ्यांना मानसिक व सामाजिक आधाराची गरज : मंदार पत्की

## 'सावित्री : हरणार नाही... लढणार' या कादंबरीचे प्रकाशन

प्रतिनिधी २४ मे

**यवतमाळ :** शेतकरी आत्महत्यांच्या गंभीर प्रश्नावर आधारित 'सावित्री : हरणार नाही... लढणार' या कादंबरीचे प्रकाशन जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी मंदार पत्की यांच्या हस्ते करण्यात आले. ग्रामपंचायत अधिकारी तथा लेखक विजयकुमार ठेंगेकर यांनी लिहिलेल्या या कादंबरीचा प्रकाशन सोहळा मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांच्या कक्षात साधेपणाने पार पडला.

यावेळी मंदार पत्की म्हणाले, "यवतमाळ जिल्हा शेतकरी आत्महत्यांमुळे संवेदनशील ठरला आहे. अशा वेळी साहित्याच्या माध्यमातून वास्तव समाजासमोर मांडणे आवश्यक आहे. 'सावित्री : हरणार नाही... लढणार' ही कादंबरी संघर्ष, जिद्द आणि आशेचा संदेश देणारी कलाकृती आहे. शेतकऱ्यांच्या वेदना समजून घेऊन त्यांना मानसिक व सामाजिक आधार देण्याची गरज आहे."



ग्रामीण वास्तव आणि शेतकरी कुटुंबांच्या भावना प्रभावीपणे मांडल्याबद्दल त्यांनी विजयकुमार ठेंगेकर यांचे कौतुक केले.

ठेंगेकर यांनी कादंबरी लेखनामागील भूमिका स्पष्ट करताना, शेतकरी आत्महत्यांमुळे उद्ध्वस्त होणाऱ्या कुटुंबांचे वास्तव समाजासमोर आणण्याचा प्रयत्न केल्याचे सांगितले.

यावेळी उपमुख्य कार्यकारी अधिकारी जालिंदर आभाळे, उपमुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत) युवराज मेहत्रे तसेच जिल्हा परिषदेतील अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

सिटी न्यूज अमरावती
रविवार, दि. २४ मे २०२६
http://epaper.citynewssuperfast.com

## दहशतवाद व हिंसाचारविरोधी दिना जिल्हाधिकारी कार्यालयात शपथ

**अमरावती:** भारताचे माजी पंतप्रधान राजीव गांधी यांच्यावर झालेल्या दहशतवादी हल्ल्याच्या पार्श्वभूमीवर दरवर्षी २१ मे रोजी 'दहशतवाद व हिंसाचार विरोधी दिवस' साजरा केला जातो. यानिमित आज जिल्हाधिकारी कार्यालयात अपर जिल्हाधिकारी गोविंदा दानेज यांनी दहशतवाद व हिंसाचार विरोधी दिवसाची अधिकारी-कर्मचाऱ्यांना शपथ दिली.

दहशतवादाचा व हिंसाचाराचा सर्व शक्तीनिशी मुकाबला करण्याची गांभीर्यपूर्वक प्रतिज्ञा यावेळी सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांनी घेतली. यावेळी निवासी उपजिल्हाधिकारी संतोष काकडे, यांच्यासह अन्य अधिकारी कर्मचारी उपस्थित होते.

# ट्रिपिंगमुळे वारंवार विद्युत पुरवठा खंडित होण्यावर तातडीने उपाययोजना करा-आ. सुलभाताई खोडके

## ♦ ऊर्जा विभागाशी निगडित असलेल्या खाजगी यंत्रणांची मदत घेऊन वेळीच दुरुस्ती करण्याची सूचना

प्रतिनिधी २४ मे

**अमरावती:** ऐन उन्हाळाचे दिवसात अमरावतीकरांना अपुऱ्या व वारंवार वीज पुरवठा खंडित होण्याच्या अडचणींचा सामना करावा लागत आहे.अनेक भागात तासंतास वीज पुरवठा चालू -बंद राहत असल्याने रखरखत्या गर्मीत नागरिक चांगलेच हैराण झाल्याने त्यांचा महावितरण विरोधात देखील अंसतोष दिसून येत आहे. त्या पार्श्वभूमीवर आमदार सुलभाताई खोडके यांनी महावितरण प्रशासनासोबत चर्चा करून शहरातील अनेक भागात निर्माण झालेल्या व्होल्टेज समस्या आणि ओव्हरलोडिंग संदर्भात अडथळे दूर करण्यासाठी तात्काळ उपाययोजना करण्याच्या सूचना केल्यात.

या संदर्भात आ.सौ. सुलभाताई खोडके यांनी महावितरणचे अधीक्षक अभियंता देवहाते यांच्याशी संवाद साधला असता त्यांनी सांगितले कि, शहराच्या सर्वच भागातील घरगुती वीज ग्राहक व वाणिज्यिक वापरातील वीज ग्राहकांना विद्युत पुरवठा करत असतांना अस्तित्वातील जुने डीपी ट्रान्सफॉर्मरवर प्रचंड लोड येत असल्याने व्होल्टेजची समस्या आणि ओव्हरलोडिंगमुळे वीज पुरवठा बंद होत आहे. ट्रान्सफार्मरवर ओव्हरलोड आल्याने ट्रिपिंग होत असल्याने शहरात वारंवार वीज पुरवठा चालू -बंद होत असल्याची माहिती त्यांनी दिली. याबाबत महावितरणकडे अपुरे संसाधने असल्याने एवढ्या मोठ्या शहराचा



डोलारा सांभाळतांना सुद्धा महावितरणला चांगली कसरत करावी लागत आहे.

यावर आ.सौ. सुलभाताई खोडके यांनी चर्चा करतांना सांगितले कि, वारंवार ट्रिपिंग होऊन वीज पुरवठा चालू -बंद होण्याच्या प्रकारावर तात्काळ दुरुस्तीसाठी प्रभावी उपाययोजना करण्यात याव्या. यासाठी ऊर्जा विभागाशी निगडित असलेल्या खाजगी यंत्रणांची मदत घेऊन वेळीच दुरुस्ती करून विद्युत पुरवठा सुरळीत करण्याच्या सूचना आ.सौ. सुलभाताई खोडके यांनी दिल्या. नुकत्याच झालेल्या खरीप पूर्व आढावा बैठकीमध्ये सुद्धा वीज पुरवठ्याच्या ट्रिपिंग संदर्भातील मुद्दा उपस्थित झाला असता , त्यासंदर्भात खाजगी संस्थांकडून तात्काळ दुरुस्तीची कामे करण्यासंदर्भात सुद्धा बैठकीत खल दिला असल्याचे आमदार महोदयांनी सांगितले.

शहरातील अनेक भागात निर्माण झालेल्या व्होल्टेज समस्या आणि ओव्हरलोडिंग संदर्भात अडथळे दूर करण्यासाठी महावितरण कडून नवीन ट्रान्सफार्मर लवकरच बसविली जाणार आहे. या कामांना अवधी लागणार आहे. त्यामुळे सद्या उन्हाळ्याचे दिवसात ट्रिपिंग मुळे ज्या वीज पुरवठा चालू -बंद होण्याच्या तक्रारी वाढल्या आहेत. याबाबत तात्काळ उपायोजना संदर्भात ऊर्जा विभागाशी निगडित असलेल्या खाजगी यंत्रणांची मदत घेऊन वेळीच दुरुस्ती करून विद्युत पुरवठा सुरळीत करण्याच्या सूचना आ. सुलभाताई खोडके यांनी दिल्या.

**आ. सुलभाताई खोडके यांच्या ११ कोटींच्या विशेष निधीतुन शहरात नवीन ट्रान्सफार्मर**

शहरातील अनेक भागात निर्माण झालेल्या व्होल्टेज समस्या आणि ओव्हरलोडिंग संदर्भात अडथळे दूर करण्यासाठी आ.सौ.सुलभाताई खोडके यांच्या ११ कोटींच्या विशेष निधी अंतर्गत शहरातील विविध ८३ ठिकाणी विद्युत डी.पी.ची क्षमता वाढ व नवीन ट्रान्सफार्मर बसविण्याच्या कामांना महावितरण कडून सुरुवात झाली आहे. या कामांतर्गत विद्यमान ज्या ओव्हरलोडेड डीटीसीचे २०० केव्हीए वरून ३१५ केव्हीए पर्यंत विस्तारीकरण करण्यात येईल, जेणेकरून कमी व्होल्टेजच्या समस्या व वारंवार डीटीसी ओव्हरलोडिंगच्या समस्या तसेच व्होल्टेजमधील चढ-उताराच्या समस्या टाळता येतील. त्यामुळे सदर डीटीसीवरील विद्यमान ग्राहकांना विश्वसनीय आणि अखंड वीजपुरवठा प्रदान करणे सोयीचे होणार आहे. तसेच व्होल्टेजची समस्या आणि ओव्हरलोडिंग टाळण्यासाठी काही भागात डीटीसीचे १०० केव्हीए , २०० केव्हीए आणि ३१५ केव्हीए क्षमतेचे नवीन ट्रान्सफार्मर सुद्धा बसविण्याच्या कामांना वेग आला आहे.

## पोलीस स्टेशन चांदुर बाजार हद्दीत अवैध धंद्यावर कारवाई

प्रतिनिधी २४ मे

**चांदुरबाजार :** पोलीस अधिक्षक निकेतन कदम यांनी पोस्टे हददीत अवैध धंदे समुळ नष्ट करायचे आदेश दिले आहे.

त्यामुळे २२/०५/२०२६ ला गुप्त खबर मिळाली कि, एक इसम बोलेरो पीक अप वाहण क. एम एच २७ एक्स ५४७२ मध्ये अवेधरीत्या टाउन मधुन तांदुळ घेवुन येत आहे अशा खबर वरुन मा. परी. सहायक पोलीस अधिक्षक सागर भामरे यांचे मार्गदर्शनाखाली पोउपनि प्रदिप कांबळे, पोकॉ मंगेश साव यांचे चमुने जयस्तंभ चौक चांदुर बाजार येथे पंचासमक्ष सापडा रचुन नाकाबंदी केली असता सरदार वल्लभाई पटेल



चौका कडुन १८/०० वा. एक पीक अप गाडी येतांना दिसला वरुन तिला हात दाखवुन थांबवुन चालकाला त्याचे नाव गाव विचारले असता त्याने आपले नाव प्रवीण वामणराव वाट रा. सरदार वल्लभाई पटेल चौका चांदुर बाजार असे सांगितले तेचे गाडीत पाहणी केली असता ३७ पोते तांदुळ अवैधरीत्या विनापरवाना घेवुन जातांना मिळुन आला वरुन त्याचे ताब्यातुन ३७ पोते तांदुळ किं. अं. ९३,७०० रु. व वाहणाची किं. ३,५०,००० रु. असा एकुण ४,४३,७०० रु. चा माल जप्त करुन ताब्यात घेतला सदर मालाची पुरवठा अधिकारी यांचे कडुन तपासणी करुन घेतला असता त्यांनी आपले अहवाला मध्ये सदर तांदुळ अवैधरीत्या काळा बाजार करण्यांच्या हेतूने खरेदी केल्याचा अहवाल दिला. वरुन आरोपी प्रवीण वामणराव वाट वय ३५ वर्ष रा. चांदुर बाजार यांचे विरुदध अप क. २३१/२०२६ कलम ३, ७ अत्यावश्यक वस्तु अधिनियम १९५५ नुसार कार्यवाही करुन आरोपीला अटक करण्यात आले. सदरची कारवाई पोलीस अधिक्षक निकेतन कदम, अपर पोलीस अधिक्षक तोडेवाड उपविभागीय पोलीस अधिकारी मनिष ठाकरे सा. यांचे मार्गदर्शनाखाली परी. सहायक पोलीस अधिक्षक सागर भामरे सा., पोउपनि प्रदिप कांबळे, पोकॉ मंगेश साव ब न २४१२ यांनी केली.

## चंद्रकुमार जाजोदिया यांचा वाढदिवस साजरा

प्रतिनिधी २४ मे

**अमरावती :** अमरावतीचे प्रख्यात समाजसेवक, आदरणीय लप्पी भैय्या, उर्फ चंद्रकुमार जाजोदिया यांचा वाढदिवस आज सकाळी ८ वाजता प्रजापिता ब्रह्मकुमारी ईश्वरीय विश्वविद्याल याच्या रुक्मिणी नगर शाखेत मोठ्या आनंदात आणि आध्यात्मिक उत्साहात साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाला मोठ्या संख्येने ब्रह्मकुमारी साधिका, समाजसेवक आणि प्रतिष्ठित नागरिक उपस्थित होते.

या कार्यक्रमाच्या प्रमुख पाहुण्या रुक्मिणी नगर सेवा केंद्राच्या संचालिका, आदरणीय राजयोगिनी ब्रह्मकुमारी सीता दीदी होत्या.



अमरावतीचे प्रख्यात उद्योगपती हरीश अडवाणी, दिलीपभाई कोटक आणि इतर अनेक प्रतिष्ठित नागरिक यांप्रसंगी उपस्थित होते. आपल्या अभिनंदन संदेशात, राजयोग साधक दिलीपभाई कोटक यांनी लप्पी भैय्या यांच्या अमरावतीमधील सामाजिक आणि आध्यात्मिक कार्याचा सविस्तर आढावा दिला.आणि सांगितले की, ब्रह्मकुमारींच्या दिव्य कार्याला त्यांनी दिलेला पाठिंबा नेहमीच प्रेरणादायी राहिला आहे. त्यांनी त्याला उत्तम आरोग्य आणि दीर्घायुष्यासाठी शुभेच्छा दिल्या आणि ही समाजसेवा पुढेही चालू ठेवण्याचे आवाहन केले. आपल्या आशीर्वादात, ब्रह्मकुमारी सीता दीदी जी म्हणाल्या, ठजसे तुझे नाव चंद्रकुमार आहे, तसा तुझा स्वभाव चंद्रासारखा शांत आणि संयमी आहे. जसा चंद्र अंधारात प्रकाश पसरवतो, तसा तू दुःखी आणि निराश लोकांच्या जीवनात आनंद आणि आशा पसरवत आहेस.ठ त्यांनी त्याच्या उज्ज्वल, निरोगी आणि दीर्घायुष्यासाठी देवाकडे प्रार्थना केली. कार्यक्रमादरम्यान, दिलीपभाई कोटक यांनी आपल्या भावपूर्ण गाण्याने कार्यक्रमात एक भावनिक वातावरण निर्माण केले, तर बीके प्रमोद भाई यांनी ठकोणाच्यातरी हास्यापुढे नतमस्तक व्हा, शक्य असेल तर कोणाचेतरी दुःख उसने घ्या, हेच तर आयुष्य आहे...' हे गीत गाऊन सर्वांना मंत्रमुग्ध केले. यानंतर, सर्वांनी केक कापून उत्साहाने वाढदिवस साजरा केला. आभार प्रदर्शनात, चंद्रकुमार जाजोदिया जी म्हणाले की ते दिव्य आणि सामाजिक कार्याला पाठिंबा देत राहतील आणि त्यांचा मुलगा अर्चित देखील सेवेची ही परंपरा पुढे चालवेल.

## बाभळीतील पाणी समस्येवर कायमस्वरूपी तोडगा काढण्याची मागणी ; स्वतंत्र पाण्याच्या टाकीसाठी निवेदन

### राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी शहराध्यक्ष अमोल अशोकसिंह गहरवार यांच्या नेतृत्वात निवेदन

प्रतिनिधी २४ मे

**दर्यापूर :** दर्यापूर नगरपरिषद हद्दीतील प्रभाग क्र. ८ मधील बाभळी परिसरामध्ये मागील अनेक महिन्यांपासून तसेच काही भागांमध्ये दोन वर्षांपासून नियमित पाणीपुरवठा होत नसल्याने स्थानिक नागरिकांना मोठ्या प्रमाणात त्रास सहन करावा लागत आहे. या गंभीर समस्येसंदर्भात राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टीचे शहराध्यक्ष अमोल अशोकसिंह गहरवार यांच्या नेतृत्वात मा. उपकार्यकारी अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण कार्यालय, दर्यापूर यांना निवेदन सादर करण्यात आले.

सदर निवेदनामध्ये बाभळी परिसरातील जुनी व अपुरी जलवाहिनी बदलून नवीन पाईपलाईन टाकण्यात



यावी, कमी दाबाने होणारा पाणीपुरवठा सुरळीत करण्यात यावा तसेच ज्या भागांमध्ये पाण्याची गंभीर समस्या आहे त्या ठिकाणी तातडीने कायमस्वरूपी उपाययोजना करण्यात याव्यात, अशी मागणी करण्यात आली.

यावेळी झालेल्या चर्चेमध्ये बाभळी परिसरातील पिण्याच्या पाण्याच्या समस्येबाबत सविस्तर आढावा घेण्यात आला. वाढती लोकसंख्या, विस्तारित वस्ती तसेच भविष्यातील पाण्याची आवश्यकता लक्षात घेता बाभळीसाठी स्वतंत्र पिण्याच्या पाण्याची टाकी उभारण्यात यावी, अशी प्रमुख मागणी करण्यात आली. तसेच सदर पाण्याच्या टाकीसाठी आवश्यक प्रस्ताव जिल्हा नियोजन समिती, अमरावती यांच्याकडे तातडीने पाठविण्यात यावा, अशी मागणीही करण्यात आली.

उपकार्यकारी अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण दर्यापूर यांनी सदर समस्येची दखल घेत आवश्यक प्रस्ताव जिल्हा नियोजन समितीकडे पाठविण्याबाबत सकारात्मक आश्वासन दिले. तसेच पाणीपुरवठा सुरळीत करण्यासाठी तांत्रिक पातळीवर आवश्यक कार्यवाही करण्यात येईल, असेही सांगितले.

यावेळी नितीन काळे, आदेश ठाकरे अमर ठाकरे, गौरव ठाकरे, श्याम ठाकरे, आकाश ठाकरे, ऋषिकेश ठाकूर, विजय भुयार व वशिम शहा उपस्थित होते.

## विधान परीषद निवडणुकीकरीता सुनिल राणा, उपमहापौर सचिन भेंडे, डॉ.अविनाश चौधरी व संजय भारसाकळे यांची उमेदवारीची मागणी

प्रतिनिधी २४ मे

**अमरावती :** अमरावती विधान परिषद निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर युवा स्वाभिमान पार्टीच्या कोअर कमेटीची महत्त्वपूर्ण बैठक पार पडली. या बैठकीमध्ये आगामी विधान परिषद निवडणुकीत महायुतीकडून युवा स्वाभिमान पार्टीला उमेदवारी देण्यात यावी, अशी ठाम मागणी कोअर कमेटीकडुन करण्यात आली.

यावेळी सुनिल राणा याच्यांसह उपमहापौर सचिन भेंडे, डॉ. अविनाश चौधरी, संजय भारसाकळे यांनी कोअर कमेटीकडे निवेदन सादर करुन अधिकृतपणे उमेदवारी मिळण्याकरीता मागणी केली. अमरावती जिल्ह्यामध्ये युवा स्वाभिमान पार्टीने गेल्या अनेक वर्षांपासून सातत्याने जनसामान्यांचे प्रश्न मार्गी



लावण्यासाठी संघर्ष केला असून ग्रामीण व शहरी भागात पक्षाची मजबूत संघटनात्मक ताकद निर्माण झाली आहे. त्यामुळे विधान परिषद निवडणुकीत पक्षाला संधी देणे आवश्यक असल्याचे मत पदाधिकाऱ्यांनी व्यक्त केले.

बैठकीमध्ये बोलताना पदाधिकाऱ्यांनी सांगितले की, युवा स्वाभिमान पार्टी ही महायुतीची विश्वासू सहयोगी असून आगामी निवडणुकीत पक्षाला उमेदवारी दिल्यास कार्यकर्त्यांमध्ये मोठा उत्साह निर्माण होईल आणि महायुतीला निश्चितच त्याचा फायदा होईल. तसेच अमरावती जिल्ह्यातील विविध स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये पक्षाचे प्रभावी संख्याबळ असून मतदारांमध्येही पक्षाबद्दल सकारात्मक वातावरण असल्याचे सांगण्यात आले. युवा स्वाभिमान पार्टीने कायम सर्वसामान्य नागरिकांचे प्रश्न शासन दरबारी मांडले असून विकासाच्या मुद्यांवर सातत्याने भूमिका घेतली आहे. त्यामुळे विधान परिषदेमध्ये पक्षाला प्रतिनिधित्व मिळणे ही काळाची गरज असल्याचे मतही व्यक्त करण्यात आले. बैठकीच्या शेवटी महायुतीच्या वरिष्ठ नेत्यांनी युवा स्वाभिमान पार्टीच्या मागणीचा सकारात्मक विचार करून अमरावती विधान परिषद मतदारसंघ पक्षाला द्यावा, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली. यावेळी पक्षाचे अनेक पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## सुरसंगीत कराओके म्युझिकल क्लब च्या वतीने जिंदगी हसने गाने के लिए कार्यक्रमाचे आयोजन

### किशोर कुमार यांच्या गीतांची मेजवानी

प्रतिनिधी २४ मे

**अमरावती:** आयुष्याच्या या रोजच्या धकाधकीच्या जीवनात आनंद उत्साह मनातले भाव आणि आपली आवड जोपासून नवोदित गायकांच्या तसेच आवड म्हणून जोपासणाऱ्या गायक मंडळी करिता सुरसंगीत कराओके क्लब यांच्या वतीने जिंदगी हसने गाने के लिए कार्यक्रमाचे भव्य आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमांमध्ये किशोर कुमार यांच्या आवाजातील गाणे असून हा कार्यक्रम रविवार दिनांक ३१ मे रोजी सायंकाळी ६ वाजता शाम चौक येथील जोशी हॉल येथे होणार आहे. गायनाच्या या कार्यक्रमाचे आयोजन श्री छत्रपती बहुउद्देशीय व क्रीडा विकास संस्था, व सुरसंगीत कराओके म्युझिकल क्लब च्या वतीने घेण्यात आला आहे. जीवनात आनंद देण्यासाठी व घेण्यासाठी हा सुरेल असा कार्यक्रम प्रभुदास फंदे व पवन फंदे यांनी घेतला आहे. कार्यक्रमात शहरातील तसेच विविध ठिकाणावरून आलेल्या गायकांनी यात मोठ्या संख्येने सहभाग घेतला आहे .तरी या गाण्याच्या मेजवानीचा आनंद शहरवासीयांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून घ्यावा असे आवाहन आयोजकांनी केले आहे. या कार्यक्रमाचे मुख्य आयोजक प्रभुदास फंदे, पवन फंदे असून या कार्यक्रमाचे कोअर कमिटी मेंबर बबलू ठाकूर, राजेंद्र वाघमारे, प्रमोद डंबाले,राजेंद्र ठाकरे, अविनाश देशमुख, विजय गायकवाड, संजय साबळे,अशोक उंबरकर, पराग अंबाडकर, सौरभ पाचडे ,गौरी सतके, ज्योत्स्ना शेटे असून यांसह यामध्ये किशोर कुमार यांच्या आवाजातील हिट गाणे आपणास ऐकायला मिळणार आहे.

## करजगाव येथील गोवंश तस्करी करणाऱ्या ८ आरोपींविरूध्द धडक कार्यवाही

### एकुण ८,५०,९७० रू चा मुद्देमाल जप्त

प्रतिनिधी २४ मे

**अमरावती :** २२/ ०५/ २०२६ रोजी सकाळी पोलीस स्टेशन शिरजगाव कसबा येथील अधिकारी व पोलीस अंमलदार यांचे पथक पोस्टे हृददीमध्ये अवैदय धंदयाचे विरूध्द कार्यवाही करणे करीता तयार केले असता मिळालेल्या गोपनीय माहीती वरून सकाळी ०५/०५ वा चे सुमारास कुरेशी मोहल्ला करजगाव येथे पंचासमक्ष कार्यवाही केली असता आरोपी रियाज अहमद उर्फ राजा अब्दुल रज्जाक वय ४६ वर्ष रा. मोहम्मदीया मस्जीद चे मांगे करजगाव याचे घरातील गोठ्यामधुन ३६ गौवंश जनावरे एकुन ४,३८,०००/- रू जप्त करण्यात आला. सदर बाबत पोलीस स्टेशन शिरजगाव कसबा येथे अपराध २४६/२६ कलम.५.५ (अ) शिक्षा कलम ९,९(अ) महाराष्ट. पशु. सरक्षणं. अधि. सह कलम. ११(१)(ड), ११(१)(४५) प्राण्यांचा छळ प्रति.अधि प्रमाणे सदर आरोपी याचे



विरूध्द गुन्हा नोंद करण्यात आला.

आरोपी शेख अहेमद शेख तमीज वय ५३ वर्ष रा.जाम पुरा करजगाव ता.चांदुर बाजार जि. अमरावती याचे घरामध्ये जावुन पंचासमक्ष रेड केली असता सदर आरोपी याचे घरातुन २ गौवंश जनावरे कि. २५,००० रूचे व ५० किलो गौवंश कापलेले मास कि. १०,००० रू व गौवंश मास कापण्या करीता व मोजण्या करीता असलेले साहीत्य असा ३८,२०० रू चा मुददेमाल मिळुन आल्याने पंचासमक्ष जागीच पंचनामा तयार करून ताब्यात घेण्यात आला. सदर गुन्हयातील आरोपी शेख सलीम शेख तमीज रा. जाम पुरा करजगाव हा अध्यापपावेतो गुन्हयामध्ये फरार आहे.

आरोपी शेख रेहान शेख सैदु वय ३२ वर्ष रा. मोहम्मदीया मस्जीद चे मागे करजगाव ता.चांदुर बाजार जि. अमरावती याचे घरामध्ये पंचासमक्ष रेड केली असता आरोपीचे घरातुन १) गौवंश जनावरे १० गौवंश जनावरे मिळुन आले कि अं. असा एकुन १,६५,०००/- रुपयाचे १) गोवंश मास ५० किलो कि.अं. १०,०००/- रू, व गौवंश मास कापण्या करीता व मोजण्या करीता असलेले साहीत्य असा एकुण १,६६,३७०/-रू चा मुददेमाल मिळून आल्याने पंचासमक्ष जागीच पंचनामा तयार करून ताब्यात घेण्यात आला.

आरोपीचे घरातुन १) गौवंश जनावरे ०७ गौवंश जनावरे मिळुन आले कि अं. असा एकुन १,०५,०००/- रुपयाचे २) मोटर सायकल एच एफ डिलक्स कमांक एम एच २७ सिएन६५६७ रंग लाल पटटा काळा रंग काळा कि.अं. ५०,०००/ रू १) गोवंश मास ५० किलो कि.अं. १०,०००/- रू, व गौवंश मास कापण्या करीता व मोजण्या करीता असलेले साहीत्य असा एकुण १,६६,३५०/-रू चा मुददेमाल मिळुन आल्याने पंचासमक्ष जागीच पंचनामा तयार करून ताब्यात घेण्यात आला. सदर बाबत पोलीस स्टेशन शिरजगाव कसबा येथे अपराध कमांक २४९/२०२६ कलम ५, ५(३७), ५(४७) ,५(७१) शिक्षा कलम ९, ९(३७), ९(४७) महाराष्ट. पशु. सरक्षणं. अधि. सह कलम. ११ (१)(ड), ११(१)(फ) प्रतिबंध अधिनीयम. प्रमाणे नोंद करण्यात आला.

## मेळघाटात विषारी पाण्याच्या संशयामुळे चार रान गवा आणि मादी लांडग्याचा मृत्यू झाल्याने वनविभागात खडबळ

जयकिसन इंगळे २४ मे

**धारणी :** मेळघाट व्याघ्र प्रकल्पांतर्गत चौराकुंड वनक्षेत्रात चार जंगली गवा आणि एका मादी लांडगीच्या संशयास्पद मृत्यूने वनविभागाला धक्का बसला आहे. वनक्षेत्रात एकाच वेळी इतके वन्य प्राणी मृतावस्थेत आढळल्याने वन्यजीव संवर्धन व्यवस्थेवर गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. मिळालेल्या माहितीनुसार, सिपना वन्यजीव विभागाच्या गस्ती पथकाला हे सर्व वन्य प्राणी वनक्षेत्रात मृतावस्थेत आढळले. विषारी किंवा दूषित पाणी , अथवा तीव्र उन्हाच्या तेजाने या वन्य प्राण्यांचा मृत्यू झाला असावा, असा प्राथमिक संशय व्यक्त केला जात आहे. या घटनेनंतर संपूर्ण मेळघाट परिसरात चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे.मेळघाट जैवविविधतेने समृद्ध आणि संवेदनशील मानला जातो.परिसरात एकाच वेळी चार गवे आणि एका मादी लांडगीच्या मृत्यूमुळे पर्यावरणवादी, वन्यजीव तज्ज्ञ आणि स्थानिक रहिवाशांमध्ये संतापाची लाट उसळली आहे. जंगलातील पाण्याचे स्त्रोत दूषित झाले असावेत किंवा एखाद्या समाजकंटकाने पाण्यात विष मिसळले असावे, अशीही चिंता व्यक्त केली जात आहे. चौराकुंड वन परिक्षेत्र अधिकारी रवींद्र खेरडे यांच्या मार्गदर्शनाखाली तपास सुरू करण्यात आला आहे.वन विभागाच्या पथकाने घटनास्थळाची पाहणी केली असून, मृत वन्यजीवांचे नमुने तपासासाठी पाठवण्यात आले आहेत.वन विभागाने सांगितले आहे की, शवविच्छेदन अहवाल प्राप्त झाल्यानंतरच मृत्यूचे नेमके कारण उघड केले जाईल. सध्या तरी, या घटनेमुळे मेळघाटातील वन्यजीव संरक्षण आणि जंगलातील पाण्याच्या स्त्रोतांच्या देखरेखीबाबत गंभीर चिंता निर्माण झाली आहे.

सिटी न्यूज सुपरफास्ट वाशीम

रविवार दि २४ मे २०२६

http://epaper.citynewssuperfast.com

## पेरणीतून उभी राहिली मानवी संस्कृती -प्रा. इंद्रजीत भालेराव

**वाशीम :** माणसाने प्राण्यांची शिकार करून खाण्याऐवजी पेरून खाण्याची सुरुवात केली, तिथूनच खऱ्या अर्थाने मानवी संस्कृती आणि शेती संस्कृतीचा उदय झाला, असे प्रतिपादन प्रसिद्ध कवी, साहित्यिक व विचारवंत प्रा. इंद्रजीत भालेराव यांनी केले. वाशिम जिल्ह्यातील अधिकारी-कर्मचारी वृंदातर्फे आयोजित 'वाशिम वासंतिक व्याख्यानमाला २०२६' अंतर्गत दुसऱ्या पुष्पाचे व्याख्यान गुरुवारी दि. २२ मे रोजी उत्साहात पार पडले. स्व. बाळासाहेब ठाकरे शेतकरी प्रशिक्षण केंद्र (आत्मा), काटा चौफुली, वाशिम येथे आयोजित कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून जिल्हाधिकारी योगेश कुंभेजकर उपस्थित होते. ज्येष्ठ साहित्यिक पद्मश्री ना.चं.कांबळे, बाबाराव मुसळे यांच्यासह अपर जिल्हाधिकारी ब्रिजेश पाटील उपविभागीय अधिकारी वैशाली देवकर जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी आरीफ शाहा, उपमुख्य कार्यकारी अधिकारी (महिला व बालकल्याण) संजय रणवीर जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. पी एस ठोंबरे आदींची प्रमुख उपस्थिती होती. 'शोध – कृषी संस्कृतीचा' या विषयावर बोलताना प्रा. भालेराव यांनी प्राचीन लोकपरंपरा, वेदकालीन संस्कृती, रामायण-महाभारतकालीन कृषी व्यवस्था तसेच संत साहित्य आणि कृषीविषयक ग्रंथांच्या आधारे शेती संस्कृतीचा समृद्ध इतिहास उलगडून सांगितला.

# जिल्ह्यात शिवसेनेला मोठा धक्का; सुरेश मापारी यांचा भाजप प्रवेश पक्का !

## *३२ वाहनाच्या ताफ्यासह २०० हून अधिक कार्यकर्ते मुंबईला रवाना

•सिटी न्युज ब्युरो @ वाशीम•

वाशिम जिल्ह्याच्या राजकारणात मोठी उलथापालथ होण्याची चिन्हे दिसू लागली आहेत. शिवसेनेचे ज्येष्ठ नेते तथा माजी जिल्हाप्रमुख सुरेश मापारी हे आज मुख्यमंत्र्यांच्या उपस्थितीत मुंबई येथे भारतीय जनता पक्षात प्रवेश करणार असल्याची जोरदार चर्चा राजकीय वर्तुळात रंगली आहे. मिळालेल्या माहितीनुसार, सुरेश मापारी यांच्या नेतृत्वात तब्बल ३० ते ३२ वाहनांचा ताफा आणि २०० हून अधिक पदाधिकारी व कार्यकर्ते मुंबईकडे रवाना झाले आहेत. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत हा प्रवेश सोहळा पार पडण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

मापारी यांच्या सोबत ग्रामीण भागातील अनेक प्रभावी पदाधिकारी, माजी जिल्हा परिषद सदस्य, पंचायत समिती सदस्य, नगर परिषद व बाजार समितीतील कार्यकर्ते देखील भाजपमध्ये प्रवेश करणार असल्याची माहिती समोर आली आहे. त्यामुळे शिवसेनेला मोठा धक्का बसणार असल्याचे मानले जात आहे. गेल्या काही वर्षांत सुरेश मापारी यांनी जिल्हा परिषद, पंचायत समिती आणि स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये महत्त्वाची भूमिका बजावली होती. ग्रामीण भागात त्यांचे मजबूत जनसंपर्क आणि कार्यकर्त्यांमध्ये असलेला प्रभाव लक्षात घेता, त्यांच्या या निर्णयाचा आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांवर मोठा परिणाम होण्याची शक्यता आहे. या घडामोडींमुळे वाशिम जिल्ह्यातील राजकीय वातावरण चांगलेच तापले असून, भाजपला मोठे बळ मिळणार असल्याची चर्चा सुरू झाली आहे.





### राजकीय कुरघोडी, शिवसेनेची बिघडली घडी...

शिवसेना पक्षातील अंतर्गत राजकीय कुरघोडी वाढल्याने शिवसेनेची राजकीय घडी बिघडली आहे. जिल्हा परिषद निवडणुकीच्या तोंडावर जिल्हा प्रमुख फेरबदलाने व माजी जिल्हा प्रमुख सुरेश मापारी यांच्या भाजप प्रवेशाने शिवसेनेचे राजकीय गणित बिघडणार आहेत.

### शिवसेनेला अनेक शिवसैनिक करणार 'जय महाराष्ट्र'...

शिवसेनेतील फेरबदलामुळे नाराज गट शिवसेनेला जय महाराष्ट्र करणार असल्याची चर्चा आहे. शहर प्रमुख गजानन भांदुर्गे यांनी शिवसेनेच्या शहर प्रमुख पदाचा राजीनामा देवून आपली नाराजी व्यक्त केली आहे. १३ नगर सेवक निवडूण आणलेल्या सुरेश मापारी यांना पदावरून काढल्याने पक्षात नाराजी पसरली आहे.

### राजकीय खेळी, अस्तित्वाचा बळी...

उध्दव बाळासाहेब ठाकरे शिवसेनेने जिल्हाप्रमुख फेरबदल करून राजकीय खेळी खेळली असली तरी जिल्ह्यात शिवसेनेच्या अस्तित्वाचा बळी जाणार की काय अशी चर्चा होत आहे. कारण माजी जिल्हाप्रमुख सुरेश मापारी हे दोनशे कार्यकर्त्यांसह आज भाजपात प्रवेश करणार आहेत. तर दुसरीकडे शिवसेनेच्या विचार सारणीत जडण घडण झालेले सुरेश मापारी हे भाजपात प्रवेश करणार असल्याने त्यांच्या विचाराच्या अस्तित्वाचा बळी जाणार की काय अशी चर्चा होत आहे.

## शिवसेनेच्या जिल्हाप्रमुखपदी बालाजी वानखेडे यांची नियुक्ती !

•सिटी न्युज ब्युरो @ वाशीम•



शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाच्या वाशीम जिल्हाप्रमुखपदी बालाजी वानखेडे यांची नियुक्ती करण्यात आली आहे. पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांच्या आदेशानुसार ही घोषणा करण्यात आली असून, शिवसेनेच्या मध्यवर्ती कार्यालयातून अधिकृत पत्रक प्रसिद्ध करण्यात आले आहे.

सामाजिक संघटना संभाजी ब्रिगेड मध्ये दीर्घकालीन काम करून जिल्हाध्यक्षपदी राहिलेल्या बालाजी वानखेडे हे पंचायत समितीचे सभापती होते. .आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका आणि राजकीय आव्हानांच्या पार्श्वभूमीवर वानखेडे यांच्या खांद्यावर मोठी जबाबदारी आली आहे. नूतन जिल्हाप्रमुख म्हणून पक्ष संघटना अधिक सक्रिय व मजबूत करण्यासाठी काम करणार असल्याची भावना बालाजी वानखेडे यांनी व्यक्त केली आहे. तसेच कार्यकर्त्यांना एकजूट ठेवून महाविकास आघाडीची ताकद वाढविण्यावर भर दिला जाणार असल्याचेही त्यांनी सांगितले.

या नियुक्तीनंतर आता जिल्हा कार्यकारिणीत कोणते फेरबदल होणार, याकडे संपूर्ण वाशीम जिल्ह्याचे लक्ष लागले आहे.

### बदलली निती, वाढणार का गती, आता पक्षाची सुत्रे कोणाच्या 'हाती'...

शिवसेना उध्दव बाळासाहेब ठाकरे गटाने शिवसेना प्रमुख फेरबदल केल्याने राजकीय निती बदलली आहे. मात्र, या नितीतून पक्षाची गती वाढणार का याकडे लक्ष लागले आहे. मात्र या बदलाचे सुत्र कोणाच्या हाती आहे याच गोष्टीची चर्चा जिल्ह्यात होत असून पक्षाची मातीतर होणार नाही ना अशी ही चर्चा आहे.

## थोडक्यात

### शिष्यवृत्ती वाढीबाबत केंद्रीय राज्यमंत्र्याचे सचीवास पत्र

•सिटी न्युज ब्युरो @ वाशीम•

मागासवर्गीय विद्यार्थ्यांच्या उच्च शिक्षणासाठी दिल्या जाणाऱ्या मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्तीमधे वाढ करण्याबाबत यवतमाळ-वाशीमचे खासदार संजय देशमुख यांनी केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री रामदास आठवले यांना ७ मे रोजी स्मरणपत्र दिले. त्यावर मंत्री आठवले यांनी आपल्या विभागाचे सचीव सौरभ गर्ग यांना दि.९ मे रोजी पत्र देवून याबाबत प्रस्ताव तयार करून सादर करण्याचे आदेश दिले आहेत.

याबाबत मावळा संघटनेचे उपाध्यक्ष राहुलदेव मनवर यांनी दि.५ मे रोजी खासदार संजय देशमुख यांना निवेदन देवून भारत सरकार मॅट्रीकोत्तर शिष्यवृत्ती योजनेंतर्गत अनुसूचित जाती (एससी), अनुसूचित जमाती (एसटी), इतर मागास वर्ग (ओबीसी), विशेष मागास गट (एनटी, डीएनटी) विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणासाठी दिल्या जाणाऱ्या शिष्यवृत्त्यांच्या रकमांमधे वाढ करण्याची मागणी केली होती. त्यामधे वर्ग ११ वी ते विविध शाखातील पदवी, पदवीका, पदव्युतर पदवी, पीएचडी अशा ४ गृपद्वारे शिष्यवृत्ती दिली जाते. त्यामधील गृप ३ च्या विद्यार्थ्यांना २०१० मधे ३ हजार रुपये दिली जात होती. त्यानंतर गेल्या १५ वर्षांत महागाई प्रचंड वाढली असली तरी शिष्यवृत्ती मात्र ३ हजारच्या दरानेच दिली जाते. याचप्रमाणे गृप १, २ व ४ च्या विद्यार्थ्यांना सुद्धा महागाईच्या दरवाढीने शिष्यवृत्ती मिळत नाही. त्यामुळे २०१० च्या शिष्यवृत्ती रकमेमधे २०० टक्के ने वाढ करणे गरजेचे असल्याचे मनवर यांनी निवेदनात म्हटले होते. यापुर्वी राहुलदेव मनवर यांनी राज्यमंत्री रामदास आठवले यांची भेट घेतली होती. त्यावर आठवले यांनी सामाजिक न्याय विभागाच्या सचीवांना दि.२३ जुलै २०२३ रोजी व ७ जुलै २०२५ रोजी पत्र दिले होते. दरम्यान मनवर यांनी सामाजिक न्याय व अधिकारीता विभागातील विविध अधिकाऱ्यांशी संपर्क साधुन पाठपुरावा केल्यामूळे यावर किर्यवाहीस वेग आल्याचे मनवर यांनी सांगितले आहे.

### जिल्ह्यात ७.८१ लाख लिटर इंधन दाखल

#### सहकार्य करण्याचे जिल्हा प्रशासनाचे आवाहन

**वाशीम :** जिल्ह्यात पेट्रोल आणि डिझेलचा तुटवडा होणार असल्याच्या अफवांना जिल्हा प्रशासनाने पूर्णपणे पूर्णविराम दिला असून नागरिकांना दिलासा दिला आहे. २० मे रोजी विविध ऑईल कंपन्यांकडून जिल्ह्याला एकूण ७ लाख ८१ हजार लिटर इंधनाचा पुरवठा करण्यात आला आहे. यामध्ये ३ लाख ७४ हजार लिटर पेट्रोल आणि ४ लाख ७ हजार लिटर डिझेलचा समावेश आहे.तर जिओ कंपनीकडून २०,००० लिटर पेट्रोल आणि १३,००० लिटर डिझेलचा साठा जिल्ह्याला प्राप्त झाला आहे.

### 'विश्वनाथ बोरकर



**वाशीम :** दस्थानिक नवीन आययुडीपी मधील रहिवाशी माजी गट शिक्षणाधिकारी विश्वनाथ यशवंत बोरकर( रिठदकर )यांचे २२ मे रोजी अल्पशा आजाराने निधन झाले . मृत्युसमयी त्यांचे वय ७६ वर्षाचे होते . विश्वनाथ बोरकर यांनी बुलडाणा आणि वाशीम जिल्ह्यात सेवा दिली . त्यांच्या पश्चात पत्नी , दोन मुले , मुलगी , नातू असा परिवार आहे . स्थानिक पद्मतिर्थ मोक्षधाम येथे त्यांच्यावर दिनांक २२ रोजी दुपारी अंत्यसंस्कार करण्यात आले . यावेळी समाज बांधवासह शैक्षणिक , सांस्कृतिक , धार्मिक , राजकीय , वैद्यकीय , क्रिडा , पत्रकारिता क्षेत्रातील मंडळी उपस्थित होती . शिक्षक जनार्दन बोरकर यांचे ते वडील होत .

# मंडळ अधिकारी बेदरकार, तलाठ्याचेच सरकार, जमीनमालक झाला बेकार, असे कसे हे शिवशाही सरकार!

## समाधान शिबीरात तक्रारदाराला झटका; बोगस खरेदीतुन तलाठ्याला लागला पैशाचा चटका

•सिटी न्युज ब्युरो @ वाशीम•

उठता बसता छत्रपती शिवाजी महाराज यांच्या कार्याचे गोडवे गाणाऱ्या महाराष्ट्रातील तीनचाकी शिवशाही सरकारच्या काळात जमीन घोटाळा, बोगस सातबारा, बोगस खरेदीचे शेकडो प्रकरणे पुराव्यानिशी उजेडात येत आहेत. अशी अनेक प्रकरणे वृत्तपत्राव्दारे उजेडात येत आहेत. मात्र अनेक तक्रारीनंतरही संबंधीत लोकसेवकांवर कोणतीच कारवाई होत नाही. उलट तक्रारदाराच्या चपला वर्षानुवर्षे झिजत आहेत. अशाच एका प्रकरणात तक्रारदाराच्या मालकीची जमीन तलाठी व मंडळ अधिकाऱ्याच्या बुद्धीचातुर्यातुन संबंधीत व्यक्तीने बोगस स्टॅम्पपेपर व बोगस खरेदीव्दारे लाटली. याप्रकरणी कोणतेच खरेदीखत नोंदविले नसल्याचे प्रमाणपत्र खुद्द दुय्यम निबंधकाने दिल्यानंतरही गेल्या दोन वर्षापासून भ्रष्टाचारी लोकसेवक व संबंधीत खाजगी व्यक्तीवर कोणतीच कारवाई होत नसल्याने मंडळ अधिकारी बेदरकार; तलाठ्याचेच सरकार; जमीनमालक झाला बेकार; असे कसे हे शिवशाही सरकार? असे म्हणण्याची वेळ जनतेवर आली आहे.

या प्रकरणाची हकीकत अशी की, तक्रारदार राम गोगरकर व नारायण कांबळे यांच्या मालकीचे वाशिम भाग-२ रामनगर येथील गट क्र. ३५४/१ मध्ये ८४ आर. जमीन आहे. या जमीनीमध्ये त्यांनी निवासी प्रयोजनाकरीता ४५ भूखंड पाडलेले आहेत. या लेआऊट मधील भूखंड क्र. ४ हा गोगरकर व कांबळे यांनी कुणालाही नोंदणी किंवा नोटरी करुन कायम मालकी हक्काव्दारे विकला नव्हता. असे असतांना २७ ऑक्टोंबर २०२३ रोजी गैरअर्जदार साईकिरण भालेराव रा. जांभरुण परांडे यांच्या नावे भूखंड क्र. ४ हा कायमस्वरुपी मालकी हक्क व ताब्यासहचा खोटा व बनावट तसेच खोट्या सह्या करुन १०० रुपयाच्या स्टॅम्पपेपरवर करारनामा केला आहे. हा स्टॅम्पपेपर रिसोड येथील गैरअर्जदार स्टॅम्पविक्रेता ए.बी. ताकतोडे यांनी



विकला आहे. तक्रारदार गोगरकर व कांबळे रिसोड येथे हजर नसतांना ताकतोडे यांनी इतर गैरअर्जदाराशी संगनमत करुन कांबळे यांच्या आधारकार्ड शिवाय हा स्टॅम्पपेपर बेकायदेशीरपणे विकला. यातील गंभीर बाब अशी की, या बनावट दस्त क्र. ७४४४/२०१६ च्या आधारे तलाठी विजय नप्ते व मंडळ अधिकारी गजानन करवते यांनी गैरअर्जदाराकडून मोठा मलीदा लाटुन ४९५० आणि ४९८१ हा खोटा व बनावट फेरफार तयार करुन सातबारा उतारा, नमुना ८ अ खोटा तयार करुन अर्जदाराची फसवणूक व लुबाडणूक केली. याबाबत ३२ जानेवारी २०२६ रोजी कांबळे यांनी दुय्यम निबंधक, जिल्हा उपनिबंधक व विभागीय आयुक्त अमरावती यांच्याकडे साईकिरण भालेराव व इतरांविरुद्ध तक्रार केली होती. सदर करारनाम्यात अर्जदाराच्या खोट्या व बनावट सह्या केल्या असून अर्जदाराचे फोटो सुद्धा खोटे आहेत. तसेच या करारनाम्यावर गैरअर्जदार गणपत भगत व व्ही. आर. काळे यांनी साक्षीदार म्हणून सह्या केल्या आहेत. या आर्थिक फसवणूकीबद्दल गैरअर्जदारांवर कारवाई होण्यासाठी नारायण कांबळे यांनी तहसिलदार, एसडीओसह पोलीस स्टेशनला सुद्धा तक्रार दिली होती. मात्र या तक्रारीवर अद्याप कोणतीही कारवाई झाली नाही. यातील उल्लेखनिय बाब अशी की, दुय्यम निबंधक वाशिम यांनी सुध्दा आमच्याकडे अशा प्रकारचा कोणताही खरेदीदस्त नोंदविला गेला नसल्याचे लेखी स्पष्ट केले आहे. त्यानंतर तक्रारदार नारायण कांबळे यांनी १३ फेब्रुवारी रोजी झालेल्या महाराजस्व शिबीरात दिलेल्या तक्रारीला थातुरमातुर उत्तरे देवून वाटाण्याच्या अक्षदा लावण्यात आल्या. स्वत:च्या मालकीचा भूखंड गैरअर्जदाराने तलाठी व मंडळ अधिकाऱ्यांच्या संगनमताने बोगस खरेदी करुन लाटल्यामुळे गोगरकर व कांबळे हवालदील झाले असून छत्रपती शिवाजी महाराजांच्या कार्याचे सदोदीत गोडवे गाणारे हेच का महाराष्ट्रातील शिवशाही सरकार? असा सवाल उभा झाला आहे.

## अफवांवर विश्वास ठेवू नका; वाशिम जिल्ह्यात पेट्रोल-डिझेलचा पुरेसा साठा

•सिटी न्युज ब्युरो @ वाशीम•

जिल्ह्यात पेट्रोल व डिझेलचा पुरेसा साठा उपलब्ध असतानाही काही ठिकाणी नागरिकांकडून पेट्रोल पंपांवर अनावश्यक गर्दी केली जात असल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे गरजू व वास्तविक ग्राहकांना इंधन मिळण्यात अडचणी निर्माण होत आहेत. ही परिस्थिती लक्षात घेता सार्वजनिक हिताच्या दृष्टीने तसेच इंधनाचा सुरळीत पुरवठा सुनिश्चित करण्यासाठी जीवनावश्यक वस्तू अधिनियम १९५५ अंतर्गत प्राप्त अधिकारांचा वापर करून प्रशासनाने महत्त्वाचे आदेश जारी केले आहेत.

जिल्ह्यातील सर्व पेट्रोल पंप चालक व मालकांनी पेट्रोल व डिझेल विक्री करताना संबंधित ग्राहक हा वाहनधारक असल्याची मूळ कागदपत्रांच्या आधारे पडताळणी करूनच इंधन विक्री करावी, असे निर्देश देण्यात आले आहेत. तसेच रुग्णवाहिका व इतर अत्यावश्यक सेवांशी संबंधित वाहनांना प्राधान्याने इंधन पुरवठा करण्याचे आदेश देण्यात आले आहेत.प्रत्येक पेट्रोल पंपावर पेट्रोलियम पदार्थांची आवक, विक्री व शिल्लक साठ्याच्या नोंदी नियमितपणे अद्ययावत ठेवणे बंधनकारक करण्यात आले आहे. तसेच उपलब्ध पेट्रोल-डिझेल शिल्लक साठा, त्या दिवशी प्राप्त झालेला तेल साठा आणि मागणी केलेल्या साठ्याची माहिती दर्शनी भागात फलकावर दररोज प्रदर्शित करावी लागणार आहे.

## नीट पेपर फुटी प्रकरणातील संबंधितांवर कारवाई करा

•सिटी न्युज ब्युरो @ कारंजा•




वाशिम जिल्हयातील बहुजनवादी संघटनांच्या वतीने निवेदन देण्यात आले की,यावर्षी भारतात २२,७९,०६३ विद्यार्थ्यांनी वैद्यकीय क्षेत्रात प्रवेश मिळण्याकरिता नीट (NEET) परीक्षा करिता अर्ज भरले होते. २२ लाखापेक्षा जास्त विद्यार्थ्यांनी रात्रदिवस अभ्यास करून डॉक्टर बनण्याचे स्वप्न पूर्ण करण्याकरिता नीट परीक्षा दिली होती.

शेतकरी शेतमजूर व मध्यम वर्गातील आई-वडिलांनी अहोरात्र कष्ट करून आपल्या मुलांना लाखो रुपये खर्च करून शिक्षण दिले. सन २०१७ पासून तीन चार वर्षामध्ये नीट परीक्षेचे सतत पेपर फुटत असल्याने परीक्षा रद्द करून पुन्हा परीक्षा घेण्यात येत असल्याने केंद्रीय शिक्षण समिती व त्याचे पदाधिकारी आणि सरकार विद्यार्थ्यांचे भविष्य उध्वस्त करून त्यांच्या जीवनाशी खेळत असून अनेक विद्यार्थ्यांनी तणाव,नैराश्य व डिप्रेशनमध्ये जाऊन आत्महत्या सुद्धा केल्या. केंद्रीय मंत्री धर्मेंद्र प्रधान, NTA अध्यक्ष प्रदीप कुमार जोशी,पेपर काढणारा व फोडणारा पी.व्ही. कुळकर्णी तसेच केंद्रीय शिक्षण समितीतील संबंधित पदाधिकाऱ्यांची कसून चौकशी होऊन त्यांची नार्को टेस्ट करून अनेक विद्यार्थ्यांच्या मृत्यूस कारणीभूत ठरलेल्या गुन्हेगाराविरुद्ध सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करून कायदेशीर कठोर कारवाई करण्यात यावी अशी मागणी निवेदनात करण्यात आली आहे. तहसीलदारांना निवेदन देताना राजू अवताडे,किशोर मानकर, संजय खाडे, आतिश चौधरी,रमेश चंदनशिव,चंद्रमणी भगत मतीनभाई कामानवाले,राजू चव्हाण, संतोष वानखडे, दीपक वानखडे, मुकुंद खडसे, राजेंद्र बेलखेडे, पंकज सावके, राजीक शेख, लखन धारू,परसराम वासनिक, गजानन अहमदाबादकर, रोमील लाठीया,नामदेव जाधव,सुमित भगत, विनोद गंभीर,महादेव ठोंबरे, विक्रम डोंगरे असे असंख्य कार्यकर्ते उपस्थित होते.

## सागवानसह आडजातीच्या झाडांची सर्रास तस्करी

•सिटी न्युज ब्युरो @ मानोरा•

### वनविभागाच्या दुर्लक्षाने राष्ट्रीय संपत्तीचे लाखो रूपयांचे नुकसान







तालुक्यातील पाळोदी, रूई, गोस्ता, शेंदुरजना (अढाव), रतनवाडी, आमदरी आदी परिसरात जंगलाचे भाग असल्याने वनविभागाच्या अधिकारी, कर्मचारी यांच्या दुर्लक्षीत धोरणामुळे सागवान व आडजातीच्या झाडांची कत्तल होऊन लाकडांची सर्रास तस्करीहोत असल्याचे चित्र दिसून येत आहे.

सविस्तर वृत्त असे की, मानोरा तालुका हा डोंगराळ भागात वसलेला असल्यामुळे मोठ्या प्रमाणावर वृक्षसंपदा संपत्तीने तालुका वेढलेला आहे. तालुक्यात रूई, गोस्ता, पाळोदी, रतनवाडी, शेंदुरजना (अढाव), आमदरी आदी परिसरात सागवान वृक्ष मोठ्या प्रमाणात आहे. येथील लाकडांचा दर्जा उच्च दर्जाचा असल्याने जिल्ह्याबाहेर लाकडाची मागणी होते. परंतु वनविभागाचे अधिकारी व कर्मचारी यांना हाताशी धरून अर्थपूर्ण व्यवहाराच्या माध्यमाने चोरट्या मार्गाने लाकडांची तस्करी करणाऱ्यांच्या संख्येत मोठ्या प्रमाणात वाढ झाल्याने वन विभागाची जंगम मालमत्ता वृक्ष कटाईमुळे दिवसेंदिवस कमी होत आहे. मानोरा तालुक्यात पाळोदी, शेंदुरजना (अढाव) येथे डेपोची चौकी आहे मात्र वनविभागाचे अधिकारी कर्मचारी मुख्यालयी राहत नसल्याने रात्रीच्या वेळी लाकडांची चोरट्या मार्गाने चोरी करणाऱ्यांना अभय मिळतो तसेच लाकडाची तस्करी करणारे व संबंधित यांची मर्जी असून आर्थिक देवाण घेवाणीचे समजते. वनविभागाच्या भोंगळ कारभारामुळे राष्ट्रीय वनसंपत्तीचे लाखो रूपयाचे नुकसान होत असून पर्यावरणावर सुध्दा याचा परिणाम होत आहे. शासनाने लाखो रूपय खर्च करून जंगलात पाणलोट, वृक्ष लावगड असे विविध कार्यक्रम राबवून तळे खदुन जलसाठा जमिनीत निर्माण होऊन झाडे जगविण्याकरिता सर्वतोपरी प्रयत्न करतो. सेच त्यावर पाहणी करण्यासाठी वनविभागाच्या अधिकाऱ्यांसह कर्मचाऱ्यांची मासिक वेतनाधर लाखो रूपये खर्च करून झाडांना जगवितात परंतु वरिष्ठांचे दुर्लक्ष व संबंधित मुख्यालयी राहत नसल्याने मोठ्या प्रमाणावर राष्ट्रीय संपत्तीची हानी होते.

वरिष्ठांनी गांभीर्याने या सर्व प्रकारावर लक्ष केंद्रीत करून निसर्ग व पर्यावरणाचा समतोल राखण्याकरिता संबंधितांना सक्ती करण्याची मागणी निसर्गप्रेमी नागरिकांच्या वतीने होत आहे.

## नाईलाजाने करावा लागतो विनातिकीट प्रवास

•सिटी न्युज ब्युरो @ वाशीम•



येथील रेल्वेस्थानकावरुन गत काही महिण्यांपासुन लांब पल्याच्या गाड्या सुरू झाल्या आहेत. तथापी रेलवेने ये-जा करणाऱ्यां प्रवाशांची संख्या वाढली आहे. मात्र रेल्वेस्थानकावर तिकीट काढण्यासाठी एकच खिडकी असल्याने अनेक प्रवाशांना रांगेत लागल्यानंतर गाडी येईपर्यंत तिकीटच मिळत नसल्याने नाईलाजाने अनेक प्रवाशांना विनातिकीट प्रवास करावा लागत असल्याचे वास्तव समोर आले आहे.

पूर्वी नॅरोगेज असलेल्या पूर्णा - अकोला मार्गाचे ब्रॉडगेज मध्ये रुपांतर झाल्यानंतर बऱ्याच रेल्वेगाड्या या मार्गावर सुरू झाल्या आहेत. गत काही महिण्यांपासून लांब पल्याच्या रेल्वे गाड्या या मार्गावर सुरू झाल्यामुळे वाशीम जिल्ह्यातील प्रवाशांना विविध ठिकाणी प्रवास करणे सोयीचे झाले आहे. या मार्गावर अकोला, तसेच हिंगोलीकडे जाण्यासाठी सकाळी दहा वाजेदरम्यान रेल्वे गाड्या असल्यामुळे अकोला तसेच हिंगोलीकडे जाण्यासाठी शेकडो प्रवासी रेल्वेस्थानकावर गर्दी करतात. रेल्वे येण्याच्या काही कालावधी आधी रेल्वेची तिकीट विक्री सुरू होते. आणि प्रवाशांची संख्या जास्त असल्याने काही प्रवाशांनाच रांगेत लागल्यानंतर तिकीट मिळते.

सिटी न्यूज सुपरफास्ट बुलडाणा

रविवार, दि. २४ मे २०२६

http://epaper.citynewssuperfast.com

# विवाहितेचा छळ; पतीसह ५ जणांविरुध्द गुन्हा

**खामगाव:** प्रेमविवाहानंतर हुंड्यासाठी विवाहितेला शारीरिक व मानसिक त्रास देत जीवे मारण्याची धमकी दिल्याप्रकरणी शिवाजीनगर पोलिसांनी पतीसह ५ जणांविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. ही कारवाई भरोसा सेल, बुलढाणा येथून प्राप्त लेखी अहवाल व आदेशानुसार करण्यात आली. व आदेशानुसार फिर्यादी सौ. रजनी शुभम संगेले (रा. कॉलनी, मेहतर सतीफैल, खामगाव) यांनी दिलेल्या तक्रारीनुसार, त्यांचा आरोपी शुभम राजू संगेले याच्यासोबत प्रेमविवाह झाला होता. विवाहानंतर आरोपींनी फिर्यादीच्या वडिलांकडून एकलाख रुपयांचा हुंडा तसेच संसारोपयोगी वस्तूंसाठी अतिरिक्त पैशांची मागणी केली. मागणीनुसार पैसे व भेटवस्तू न मिळाल्याने आरोपींनी फिर्यादीला चांगली वागणूक न देता वारंवार शारीरिक व मानसिक छळ केला, शिवीगाळ करून जिवे मारण्याची धमकी दिल्याचे तक्रारीत नमूद आहे.या प्रकरणी आरोपी शुभम राजू संगेले, राजू बुद्ध संगेले, राधा राजू संगेले, करण राजू संगेले व शंकर राजू संगेले (सर्व रा. रेखा प्लॉट, कमली बाबा मंदिराजवळ खामगाव यांच्याविरुद्ध भारतीय दंड संहितेच्या कलम ४९८ (अ), ३२३, ५०४ व ५०६ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# जिल्हाधिकाऱ्यांनी केली इंधन साठ्याची प्रत्यक्ष पाहणी

## ◆ साठेबाजी करणाऱ्यांना कडक कारवाईचा इशारा; अफवांवर विश्वास न ठेवण्याचे नागरिकांना आवाहन

प्रतिनिधी २४ मे

**बुलढाणा:** जिल्ह्यात इंधनाचा तुटवडा असल्याच्या चर्चा आणि नागरिकांमधील संभ्रमाच्या पार्श्वभूमीवर, जिल्हाधिकारी डॉ. प्रविणकुमार देवरे यांनी शनिवार २३ मे रोजी स्वतः ॲक्शनमोड मध्ये येत जिल्ह्यातील विविध पेट्रोल पंपांना अचानक भेटी दिल्या. या आकस्मिक तपासणीदरम्यान त्यांनी पेट्रोल आणि डिझेलच्या उपलब्ध साठ्याची तसेच पुरवठा साखळीची प्रत्यक्ष पाहणी करून माहिती घेतली. नागरिकांनाइंधन खरेदी करताना कोणत्याही प्रकारचा त्रास होऊ नये, यासाठी प्रशासनाने हे पाऊल उचलले आहे.





गेल्या काही दिवसांत इंधन पुरवठ्याबाबत सोशल मीडियावर पसरलेल्या विविध अफवांमुळे जिल्ह्यातील काही पेट्रोल पंपांवर वाहनधारकांच्या लांबच लांब रांगा पाहायला मिळत होत्या. ही परिस्थिती लक्षात घेऊन जिल्हाधिकारी डॉ. प्रविणकुमार देवरे यांनी कोणत्याही पूर्वसूचनेशिवाय शहरातील आणि मुख्य महामार्गावरील प्रमुख पेट्रोल पंपांना भेटी दिल्या. त्यांनी थेट पंपावरील व्यवस्थापक व कर्मचाऱ्यांशी संवाद साधला आणि 'स्टॉक रजिस्टर' ची सखोल तपासणी केली. तसेच, प्रत्यक्ष भूगर्भातील टाक्यांमध्ये (Uderground Tanks) किती इंधन शिल्लक आहे, याची मोजणी करून घेण्याचे निर्देश दिले. या तपासणी दरम्यान जिल्हाधिकाऱ्यांनी ऑईल कंपन्यांचे प्रतिनिधी आणि जिल्हा पुरवठा विभागाच्या

अधिकाऱ्यांशी चर्चा करून जिल्ह्यात आगामी दिवसांसाठी पुरेसा इंधन साठा उपलब्ध असल्याची खात्री केली. कोणत्याही पंपावर इंधनाची साठेबाजी किंवा कृत्रिम टंचाई निर्माण केली जात असल्याचे आढळल्यास, संबंधित चालकाविरुद्ध परवाना रद्द करण्यासह कडक कायदेशीर कारवाई करण्याचा इशारा त्यांनी दिला. पंपांवर गर्दीमुळे वाहतुकीची कोंडी किंवा कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ नये, यासाठी आवश्यक त्या ठिकाणी चोवीस तास पोलीस बंदोबस्त तैनात करण्याच्या सूचनाही त्यांनी पोलीस प्रशासनाला दिल्या. जिल्ह्यात पेट्रोल आणि डिझेलचा पुरेसा साठा उपलब्ध आहे. ऑईल कंपन्यांकडून नियमित पुरवठा सुरू आहे. त्यामुळे नागरिकांनी कोणत्याही अफवांवर विश्वास ठेवून पेट्रोल पंपांवर विनाकारण गर्दी करू नये. केवळ आवश्यकतेनुसारच इंधन खरेदी करावे. जिल्ह्यात कुठेही इंधनाचा तुटवडा भासणार नाही, असे आवाहन जिल्हाधिकारी डॉ. प्रविणकुमार देवरे यांनी यावेळी केले. सर्व नागरिकांना शांततेत आणि सुरळीतपणे इंधन मिळावे यासाठी पोलीस बंदोबस्त लावण्यात आला आहे.पेट्रोल पंपांवर शांतता राखावी, कोणीही कायदा व सुव्यवस्था बिघडवण्याचा प्रयत्न केल्यास अथवा साठेबाजीला प्रोत्साहन दिल्यास संबंधितांवर कडक कायदेशीर कारवाई करण्यात येईल, असा इशारा पोलीस अधीक्षक निलेश तांबे यांनी दिला आहे.

# मलकापूरात ३१ मे रोजी कृपा महोत्सव श्याम भजन संकीर्तनचे आयोजन

प्रतिनिधी २४ मे

**मलकापूर :** मलकापूर नगरीत प्रथमच आयोजित करण्यात येत असलेल्या भव्य कृपा महोत्सव श्याम भजन संकीर्तन महोत्सवची जय्यत तयारी सुरू असून, ३१ मे रोजी सायंकाळी ७ वाजता कृषी उत्पन्न बाजार समिती यार्ड बेलाड येथे हा धार्मिक सोहळा मोठ्या उत्साहात पार पडणार आहे. या कार्यक्रमाच्या नियोजनासाठी काल सायंकाळी आयोजक समितीची महत्त्वपूर्ण बैठक पार पडली. बैठकीत कार्यक्रमाच्या संपूर्ण तयारीचा आढावा घेऊन विविध जबाबदाऱ्या निश्चित करण्यात आल्या.



कार्यक्रमादरम्यान पावन ज्योत, भव्य श्रृंगार, पुष्प वर्षा, इत्र वर्षा, श्याम रसोई, छप्पन भोग आदी विविध धार्मिक विधी व आकर्षक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले असल्याची माहिती आयोजक समितीतर्फे देण्यात आली. या धार्मिक वातावरणात भक्तांना भक्तिरसाचा अनोखा अनुभव मिळणार असल्याचे आयोजकांनी सांगितले. सदर भजन संध्या कार्यक्रमात कलकत्ता येथील सुप्रसिद्ध भजन गायक संजय मित्तल आपल्या सुश्राव्य वाणीने भक्तांना मंत्रमुग्ध करणार आहेत. तसेच दिग्रस येथील प्रसिद्ध गायक जय शर्मा यांचीही विशेष साथ लाभणार आहे. दोन्ही गायकांच्या सादरीकरणामुळे कार्यक्रमाला विशेष रंगत येणार असल्याची भावना श्यामभक्तांमध्ये व्यक्त होत आहे.

# गोमांस विक्रेत्या तिघांना अटक; सव्वा लाखाचा मुद्देमाल जप्त

## ◆ शिवाजीनगर पोलिसांची कारवाई

प्रतिनिधी २४ मे

**खामगाव:** येथील फाटकपुरा, दालफैल व मस्तानचौक भागात छापे टाकून गोमांस विक्री करणाऱ्या तिघांना अटक करून १ लाख २४ हजार १०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. सदर कारवाई शिवाजी नगर पोलिसांनी २३ मे रोजी केली.

शिवाजीनगर पोस्टे हद्दीतील फाटकपुरा, दालफैल व मस्तान चौक भागात गोमांस विक्री होत असल्याच्या मिळालेल्या गोपनीय माहितीवरून पोलिसांनी छापे टाकले. यावेळी शेख अहमद शेख समद रा. फाटकपुरा, दालफैल खामगाव यांचे घरात कत्तल केलेले गोवंशाचे मांस अंदाजे ७० किलो तर त्याच्या दुसऱ्या घरात एकूण ७ बैल (गोन्हे) एकूण किंमत १ लाख १० हजार रुपये व कत्तलीसाठी वापरण्यात येणारे साहित्य कि. अंदाजे २००० रुपये तसेच शेख आजम कुरेशी शेख मुसा कुरेशी रा. मस्तान चौक खामगाव याचे राहत्या घरातून कत्तल केलेले गोवंशाचे मास अंदाजे ५० किलो किं. अंदाजे १० हजार रुपये व कत्तली साठी वापरण्यात येणारे साहित्य एकूण २१०० रुपये असा दोन्ही कार्यवाहीमधील एकूण १ लाख २४ हजार १०० रुपयांचा मुद्देमाल पंचासमक्ष जप्त करून ताब्यात घेतला तर कत्तल केलेले गोवंश मांस स्थानिक नगरपरिषद यांचे सहाय्याने नष्ट करण्यात आले. तसेच मिळून आलेले गोवंश यांना गोशाळेत पुढील देखभाली करिता रवाना करण्यात आले आहे. याप्रकरणी शिवाजीनगर पोस्टेला अप क्र. २०४/२०२६, कलम ५ (क), ९ (अ), महाराष्ट्र प्राणी संरक्षण अधिनियम १९७६, सहकलम ११ (च) प्राण्यांना कुरतेने वागविणे अधिनियम १९६०, सहकलम ३२५, ३(५) भान्यास २०२३ प्रमाणे व (०२) अप क्र. २०५/२०२६ कलम ५ (क), ९ महाराष्ट्र प्राणी संरक्षण अधिनियम १९७६, सहकलम ३२५ भान्यासं २०२३ प्रमाणे गुन्हे दाखल करण्यात आले असून त्यात शेख अहमद शेख समद, शेख आझाद शेख फत्ता व शेख आजम कुरेशी शेख मुसा कुरेशी या तीन आरोपींना अटक करण्यात आली आहे.

# शेगावातील गेस्ट हाउसमधील कुंटणखान्यावर पोलिसांचा छापा

## ◆ चालक, ग्राहकांसह हॉटेलमालकावर गुन्हा

प्रतिनिधी २४ मे

**शेगाव:** शहरातील इकबाल चौक परिसरातील गेस्ट हाउसमध्ये सुरू असलेल्या कथित कुंटणखान्यावर शेगाव शहर पोलिसांनी शुक्रवारी (दि. २२) रात्री छापा टाकत कारवाई केली. या प्रकरणी कुंटणखाना चालवणाऱ्या व्यक्तीसह चार ग्राहक आणि गेस्ट हाउसच्या मालकाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.




पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, आरोपी हुसेन खान अजगर खान (रा. शेगाव) हा गेस्ट हाउसमध्ये महिलांकडून कुंटणखाना चालवत होता. ग्राहकांना बोलावून त्यांच्याकडून पैसे घेऊन व्यवसाय सुरू असल्याची माहिती पोलिसांना मिळाली होती. त्यानुसार पोलिसांनी छापा टाकला असता घटनास्थळी चार ग्राहक आढळून आले. या प्रकरणी गणेश साहेबराव खरात (रा. चांदमारी, खामगाव), आदेश श्रावण काळे (२६, रा. तरोडा, ता. धामणगाव रेल्वे, जि. अमरावती), यश अशोक पैठणकर (२१, रा. शंकरनगर, खामगाव), गजानन आत्माराम निर्मळ (२९, रा. विहीगाव अटाळी, ता. खामगाव) तसेच गेस्ट मूळ हाउसच्या मालकाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिस उपनिरीक्षक कुणाल जाधव यांच्या फिर्यादीवरून शेगाव शहर पोलिस ठाण्यात २२ मे रोजी रात्री गुन्हा दाखल करण्यात आला. कारवाईदरम्यान पोलिसांनी रोख रक्कम, सौंदर्यप्रसाधने तसेच अन्य साहित्य असा एकूण ४ हजार १७५ रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. पीडित महिलांची सुटका करण्यात आली.

## समिश्र

# राज्यातील माळी समाजातील नवनिर्वाचित सदस्य आणि पदाधिकाऱ्यांचा सत्कार सोहळा

प्रतिनिधी २४ मे

**अकोट:** माळी विकास मिशन द्वारे समाजातील राज्यभरातील स्थानिक स्वराज्य संस्थांमधील पंचायत समिती, जिल्हा परिषद, नगरपरिषद, नगरपालिका, महानगरपालिका मधील सर्व नवनिर्वाचित सदस्य आणि पदाधिकारी यांचा सत्कार सोहळा व प्रबोधन शिबिर २०२६ चे उदघाटन ह.भ.प. सावता महाराज वसेकर, आमदार योगेश अण्णा टिळेकर यांचे हस्ते होणार आहे

कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे अन्न व नागरी पुरवठा मंत्री ना. छगन भुजबळ, ग्रामविकास मंत्री नामदार, जयकुमार गोरे, बहुजन कल्याण मंत्री नामदार अतुल सावे यांचे शुभहस्ते हा सत्कार सोहळा पार पडणार आहे .यावेळी श्री. महेश झगडे सेवानिवृत्त ख-ड शेखर गायकवाड सेवानिवृत्त ख-ड यांचे मार्गदर्शन होणार आहे तर यावेळी खा. डॉ. अमोल कोल्हे, मा. आ.उमेश उर्फ चंदू यावलकर, आ. डॉ. प्रज्ञाताई सातव, मा. आ.कपिल पाटील आदी मान्यवर उपस्थित राहणार आहेत.

रविवार दि.३१ मे २०२६ सकाळी १०:३० ते ५:३० सावित्रीबाई फुले सभागृह, गंज पेठ, पुणे. येथे हा कार्यक्रम पार पडणार आहे या कार्यक्रमास राज्यातील सर्व माळी समाजातील नगरसेवक, नगराध्य, उप नगराध्यक्ष, महापौर, उपमहापौर, जिल्हा परिषद सदस्य, सभापती, पंचायत समिती सदस्य व सभापती मोठ्या संख्येने सहभागी व्हावे असे आवाहन माळी विकास मिशनचे राज्य समन्वयक संतोष भोजने शि. प्र.स धाराशिव, सेवानिवृत्त ए सी पी सुरेश जाधव सातारा मुंबई, के. आर. चौधरी, मुंबई, अशोक भुजबळ तळेगाव, राजकीय समिती इंजि. वासुदेव चौधरी, आ.समिती डॉ. श्रीकृष्ण ढोणे ठाणे, स्प. परीक्षा मार्गदर्शन समिती प्रा. अमृतराव काळोखे सातारा रोजगार समिती राजेंद्र अहिरे यांचे नाशिक, उद्योजक व कृषी समिती गोविंद डाके लातूर, पुणे, दक्षता समिती ॲड. मिलिंद घोडेकर नारायणगाव, पुणे, युवा विभाग उमेश महाजन जळगांव, प्रदेश प्रवक्ते विलास इंगळे अकोला, कला व संस्कृती समिती शरद वन्हेकर अमरावती नामदेव जाधव धुळे डॉ अरुणा माळी कोल्हापूर, शीतल साखरे गेवराई, बीड यांनी केले आहे.

# मूर्तिजापूर तालुक्यात छत्रपती शिवाजी 'महाराज महसूल समाधान शिबीर' संपन्न

प्रतिनिधी २४ मे

**मूर्तिजापूर:** महसूल विभागामार्फत राबविण्यात येत असलेल्या 'छत्रपती शिवाजी महाराज समाधान शिबीर' अभियानाचा पहिला टप्पा आज मूर्तिजापूर तालुक्यातील येथील जिल्हा परिषद हायस्कूल माना येथे मोठ्या उत्साहात पार पडला. महसूल मंडळ 'माना' अंतर्गत आयोजित या शिबिरामध्ये शेकडो नागरिकांना विविध दाखले, प्रमाणपत्रे आणि डिजिटल सेवांचा लाभ एकाच छताखाली मिळवून देण्यात आला.




जिल्हाधिकारी वर्षा मीना यांच्या मार्गदर्शनाखाली उपविभागीय अधिकारी संदिपकुमार अपार व तहसीलदार शिल्पा बोबडे यांनी या विशेष शिबिराचे आयोजन केले होते.

१५ स्टॉल्सच्या माध्यमातून विविध सेवांचा लाभ. नागरिकांच्या सुविधेसाठी शिबीर स्थळी विविध शासकीय विभागांचे एकूण १५ स्टॉल्स लावण्यात आले होते. यामध्ये प्रामुख्याने: महसूल विभाग धान्य पुरवठा, संजय गांधी निराधार योजना महिला व बाल विकास विभाग महावितरण, महाराष्ट्र परिवहन महामंडळ व आरोग्य विभाग सेतू केंद्र, आधार केंद्र, आणि महिला बचत गट दुय्यम निबंधक कार्यालय, भूमी अभिलेख आणि कृषी विभाग या स्टॉल्सच्या माध्यमातून नागरिकांना डिजिटल सेवा, ई-फेरफार, ई-मोजणी, अभिलेख दुरुस्ती, प्रमाणपत्र वितरण आणि महसुली बाबींचे थेट मार्गदर्शन करण्यात आले.एकाच दिवशी १०६९ कामांचा निपटारा केला.

या अभियानांतर्गत महसूल विभागाने अत्यंत गतीने काम करत तब्बल ङ१०६९ङ प्रकरणांचा आणि प्रमाणपत्रांचा निपटारा केला.

तक्रारींचा तातडीने निपटारा करण्याचे निर्देश कार्यक्रमाच्या ाध्यक्षस्थानावरून बोलताना तहसीलदार शिल्पा बोबडे यांनी दिल्या. शिबिराच्या ठिकाणी उपस्थित असलेल्या सर्व कार्यालय प्रमुखांकडून प्रलंबित प्रकरणांचा आढावा घेतला. या शिबिरात नागरिकांकडून विविध विभागांच्या एकूण १३ तक्रारी प्राप्त झाल्या. या सर्व तक्रारींचा तातडीने निपटारा करून तसा अहवाल सादर करण्याचे निर्देश तहसीलदार बोबडे यांनी अधिकाऱ्यांना दिले.

या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून सातवे ग्रामपंचायतीचे सरपंच जमील भाई उपस्थित होते. तसेच निवासी नायब तहसीलदार रविंद्र राऊत यांनी कार्यक्रमाची प्रस्तावना मांडली.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शिक्षक वसंतराव कदम यांनी केले, तर आभार प्रदर्शन ग्राम महसूल अधिकार सागर काशिकर यांनी केले. हे शिबीर यशस्वी करण्यासाठी महसूल मंडळ माना येथील मंडळ अधिकारी प्रफुल्ल काळे, ग्राम महसूल अधिकारी सरिता चाटे, सागर काशिकर, कु. पुनम घाटे, सुनिल मोहोड आणि . विवेक थोरात यांनी परिश्रम घेतले. तसेच निवासी नायब तहसीलदार रविंद्र राऊत, नायब तहसीलदार महसूल दिनेश सोनोने आणि निरीक्षण अधिकारी रुहीना अली यांनी विशेष सहकार्य केले.

मूर्तिजापूर तालुक्यात विविध ठिकाणी आयोजित होणाऱ्या 'छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिरांचा' तालुक्यातील सर्व शेतकरी, विद्यार्थी आणि सर्वसामान्य नागरिकांनी जास्तीत जास्त संख्येने लाभ घ्यावा असे आवाहन तहसीलदार शिल्पा बोबडे यांनी केले.

# जनगणना करताना शिक्षकाला कुत्र्याचा चावा; प्रशासनाच्या नियोजनावर प्रश्नचिन्ह

**मूर्तिजापूर :** शासनाच्या माध्यमातून सध्या जनगणना व एसआयआरचे काम वेगाने सुरू असून, या कामाची जबाबदारी शिक्षकांवर सोपविण्यात आली आहे. प्रचंड उष्णतेमध्ये घरोघरी जाऊन माहिती संकलन करताना शिक्षकांना अनेक अडचणींचा सामना करावा लागत आहे. अशातच मूर्तिजापूर येथे जनगणना करत असताना एका शिक्षकाला कुत्र्याने चावा घेतल्याची घटना घडली असून, शहरात याची जोरदार चर्चा सुरू आहे.

स्थानिक जे. बी. हिंदी विद्यालयात कार्यरत असलेले शिक्षक निळकंठ वाकोडे हे जनगणनेच्या कामासाठी राजगृह नगर परिसरात गेले होते. एका घरासमोर कुत्रा मोकळा फिरत असल्याचे पाहून त्यांनी घरमालकाला कुत्रा बांधून ठेवण्याची विनंती केली. मात्र, 'कुत्रा काही करत नाही, तुम्ही या,' असे उत्तर घरमालकाने दिल्याचे सांगितले जाते.

यानंतर निळकंठ वाकोडे यांनी घरात प्रवेश करताच कुत्र्याने अचानक त्यांच्या पायाला चावा घेतला. या हल्ल्यात त्यांच्या पायाला चार दात लागून दुखापत झाली. घटनेनंतर त्यांनी तातडीने लक्ष्मीबाई उपजिल्हा रुग्णालयात जाऊन उपचार घेतले. सध्या राज्यभरात तापमानाचा पारा ४५ अंशांच्या पुढे गेला असताना शिक्षकांना विविध शासकीय कामांसाठी घरोगरी फिरावे लागत आहे. त्यामुळे त्यांच्या सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. शासन व प्रशासनाने अशा शिक्षकांच्या सुरक्षेकडे विशेष लक्ष देऊन आवश्यक उपाययोजना कराव्यात, अशी मागणी शिक्षक वर्गातून होत आहे.

# नवोदय विद्यालय प्रवेश परीक्षेत 'जैन साध्वी प्रभा प्रकाश कॉन्व्हेंट'ची अनुश्री बंड जिल्ह्यात प्रथम

प्रतिनिधी २४ मे

**आलेगाव:** नवोदय विद्यालय इयत्ता ९ वी साठी घेण्यात आलेल्या प्रवेश परीक्षेत, जैन साध्वी प्रभा प्रकाश कॉन्व्हेंट येथील विद्यार्थिनी अनुश्री शत्रुघ्न बंड हिने यश मिळवले. अनुश्रीने या परीक्षेत अकोला जिल्ह्यातून प्रथम क्रमांक, तर संपूर्ण महाराष्ट्र राज्यातून १४ वा क्रमांक पटकावून नवोदय विद्यालयातील प्रवेशासाठी आपले स्थान निश्चित केले आहे.



अनुश्रीच्या यशात शाळेचे आधारवड सुभाष जैन आणि अध्यक्ष अक्षय जैन यांचे मोलाचे पाठबळ लाभले. तसेच शिक्षणाधिकारी (प्राथमिक) रतनसिंग पवार, पातूरचे गटशिक्षणाधिकारी प्रवीण डाबेराव, विस्तार अधिकारी, तसेच आलेगाव केंद्राचे केंद्रप्रमुख श्रीनिवास चव्हाण यांचे वेळोवेळी मार्गदर्शन व प्रोत्साहन तिला प्राप्त झाले. तिच्या या घवघवीत यशाबद्दल शाळेचे मुख्याध्यापक महावीर जैन यांच्यासह सर्व शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचारी यांनी तिचे कौतुक केले आहे.

# भाववृक्ष चळवळ घराघरात सुरु व्हावी

**अकोला :** जिल्ह्यावर यावर्षी सूर्य जणुकाही आग ओकत आहे. दिवसा प्रचंड तापमान व रात्री असह्य उकाडा यामुळे प्रत्येक जण हैराण झाला आहे.

यावर पर्याय म्हणून मागील दोन वर्षापूर्वी भाववृक्ष या व्हाट्सअप ग्रुपवर एक आवाहन करण्यात आले होते ते असे की, या ग्रुपमधील प्रत्येक सदस्याने आपल्या घरीच वड, पिंपळ, चिंच, उंबर, आंबा किंवा कोणत्याही एखाद्या वृक्षाची घरीच एखाद्या प्लास्टिक पिशवीत, गोण्यात किंवा कुंडीत लागवड करावी व एक वर्ष त्या वृक्षाची घरीच जोपासना करून दुसऱ्या वर्षी त्या वृक्षाची आपापल्या दृष्टीने योग्य अशा ठिकाणी लागवड करावी. या आवाहनाला उत्तम प्रतिसाद मिळाला व त्या ग्रुपवरील बहुतांश सदस्यांनी तसे फोटो ग्रुपवर टाकले. ही चळवळ जर व्यापक बनली तर यातून पर्यावरणाची फार मोठी समस्या सुटेल. या चळवळीचा उद्देश असा होता की, तुमच्या घरातील जिवंत किंवा मृत कोणत्याही व्यक्तीच्या किंवा तुमचा ज्या देवावर भाव असेल त्या देवाच्या नावाने वृक्ष जगवणे आणि त्याचे संगोपन करणे. या आवाहनाला उत्तम प्रतिसाद मिळाला. आज अकोला जिल्ह्याची पर्यावरणाच्या बाबतीत फार वाईट अवस्था आहे. उत्तम पर्यावरणासाठी किमान ३३ ऽ जंगल असणे आवश्यक आहे पण अकोला जिल्ह्यात मागे वृत्तपत्रात आलेल्या बातमीनुसार जिल्ह्यात फक्त ७ऽ जंगल शिल्लक आहे. रस्ते रुंदीकरण, गौण खनीज उत्खनन, वाढते शहरीकरण सोबतच गावांच्या होणाऱ्या विस्तारामुळे लाखो झाडे कापल्या गेली आहेत.

सोबतच सगळीकडे सिमेंट कॉंक्रीटचे घरे व सिमेंट कॉंक्रीटचे किंवा पेव्हर्सचे रस्ते यामुळे प्रचंड तापमान वाढत आहे. देशी वृक्ष डौलदार असून ते उष्णता शोषून घेतात त्या उद्देशाने भाव वृक्ष व्हाट्सअप ग्रुपच्या माध्यमातून अशा देशी वृक्ष लागवडीचे आवाहन करण्यात येऊन कुठल्याही गवगव्या शिवाय तशी चळवळ सुरु करण्यात आली असून ही चळवळ व्यापक बनण्याची नितांत गरज आहे असे महेंद्र कराळे यांनी म्हटले आहे.

## निधन वार्ता

### शकुंतलाबाई बेलसरे



**अकोट:** वडाळी देशमुख येथील शकुंतलाबाई महादेव बेलसरे (८८) १८ ला निधन झाले. त्यांच्या पक्षात दोन मुले व एक मुलगी आणि मोठा आप्तपरिवार आहे.

# कर्मयोद्धा चंद्रकांतदादा

युवा नेते, वाशीम जिल्हा परिषदचे मा. अध्यक्ष, राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष
मा. श्री. चंद्रकांतदादा ठाकरे
यांना वाढदिवसानिमित्त
हार्दिक शुभेच्छा
शुभेच्छुक
श्री. सुनिल कांबळे ग्रामपंचायत अधिकारी
ग्रामपंचायत कंझारा

युवा नेते, वाशीम जिल्हा परिषदचे मा. अध्यक्ष, राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष
मा. श्री. चंद्रकांतदादा ठाकरे
यांना वाढदिवसानिमित्त
हार्दिक शुभेच्छा
रमेश सवाईराम राठोड — सरपंच
शुभम मुरलीधर देशमुख — ग्रामपंचायत अधिकारी
उपसरपंच रामेश्वर कळनाजी चौधरी सदस्य
* मनुताई दिलीप पवार *कामिना विजय राठोड
* वंदना सुधीर ठोके * किरण रामेश्वर इंगोले
*भौरिलाल कनीराम राठोड * सतीश तात्याराव गावंडे
समस्त ग्रामस्थ चिखलागड

हार्दिक शुभेच्छा
युवा नेते, वाशीम जिल्हा परिषदचे मा. अध्यक्ष, राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष
मा. श्री. चंद्रकांतदादा ठाकरे
यांना वाढदिवसानिमित्त
हार्दिक शुभेच्छा
शिखरे उत्कर्षाची दादा तुम्ही करीत राहावी
कधी वळून आमची शुभेच्छा स्मरावी..!
तुमच्या इच्छा आकांक्षांचा वेलू गगनाला भिडू दे!
तुमच्या जीवनात सर्वकाही मनासारखे घडू दे!
श्री ज्ञानदेव बाबाराव लोडम शिक्षक
सिमाताई ज्ञानदेव लोडम (सुर्वे) ग्रा.पं.अधिकारी
दादा तुला दिर्घआयुष्य लाभो ही इच्छा...

हार्दिक शुभेच्छा
युवा नेते, वाशीम जिल्हा परिषदचे मा. अध्यक्ष, राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष
मा. श्री. चंद्रकांतदादा ठाकरे
यांना वाढदिवसानिमित्त
हार्दिक शुभेच्छा
शुभेच्छुक
शुभेंद्र विक्रम जावळे
श्री. रामकृष्ण भगवान बेलखेडे से.नि.शि.
प्रा. राहुल रा. बेलखेडे,
दिपांश शु. जावळे
समस्त बेलखेडे - जावळे परिवार, मंगरूळपीर
दिपा रामकृष्णा बेलखेडे (जावळे) ग्राम पंचायत अधिकारी
शुभेंद्र विक्रम जावळे आयडीबीआय बँक वर्धा
दिपांश शुभेंद्र जावळे

युवा नेते, वाशीम जिल्हा परिषदचे मा. अध्यक्ष, राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष
मा. श्री. चंद्रकांतदादा ठाकरे
यांना वाढदिवसानिमित्त
हार्दिक शुभेच्छा
टी.टी. जाधव — प्रशासक ग्रा.पं. एकांबा
श्री. व्ही.के. सावके — ग्रा.पं. अधिकारी
समस्त ग्रामस्थ, एकांबा ता.जि. वाशीम

हार्दिक शुभेच्छा
युवा नेते, वाशीम जिल्हा परिषदचे मा. अध्यक्ष, राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष
मा. श्री. चंद्रकांतदादा ठाकरे
यांना वाढदिवसानिमित्त
हार्दिक शुभेच्छा
शुभेच्छुक
समस्त इंगोले भगत परिवार मंगरूळपीर
ज्योती विनोद इंगोले (भगत) आदर्श ग्रा.पं. अधिकारी
विनोद काशिराम इंगोले

हार्दिक शुभेच्छा
युवा नेते, वाशीम जिल्हा परिषदचे मा. अध्यक्ष, राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष
मा. श्री. चंद्रकांतदादा ठाकरे
यांना वाढदिवसानिमित्त
हार्दिक शुभेच्छा
शुभेच्छुक
श्रीधर महादेव शिंदे
ग्रामपंचायत अधिकारी
दस्तापुर/शेलगाव/बोरव्हा खुर्द

युवा नेते, वाशीम जिल्हा परिषदचे मा. अध्यक्ष, राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष
मा. श्री. चंद्रकांतदादा ठाकरे
यांना वाढदिवसानिमित्त हार्दिक शुभेच्छा
खेमासिंग कनिराम राठोड — सरपंच
श्री. रामराव किसन मळघणे — ग्रामविकास अधिकारी
वैशाली कनिराम चव्हाण, उपसरपंच
सर्वसदस्यगण: - कोकीळाबाई अशोक चारखोड, पार्वतीबाई बाळु चारखोड, श्रीमती शंकुतला बजरंग अंभोरे, सौ. वर्षा पंजाब पवार, श्री. पवन अशोक चव्हाण, श्री. श्यामराव भिमराव खडसे, श्री पंडीत कन्नीराम इंगोले, श्री. मंगेश नामदेव राठोड, श्री. प्रमोद काशिराम खडसे ग्राम पंचायत कर्मचारी, तुषार रणजीत चव्हाण कर्मचारी, इंद्रसिंग खेमसिंग राठोड संगणक परिचालक, शंशीकात रामभाऊ रोकडे रोजगार सेवक,
समस्त ग्रामस्थ गटग्रामपंचायत धानोरा खु. मसोला खु.

हार्दिक शुभेच्छा
युवा नेते, वाशीम जिल्हा परिषदचे मा. अध्यक्ष, राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष
मा. श्री. चंद्रकांतदादा ठाकरे
यांना वाढदिवसानिमित्त हार्दिक शुभेच्छा
शुभेच्छुक
दिपाली ब्रम्हदेव वाकोडे (ढोरे) ग्राम पंचायत अधिकारी
संदिप किसन ढोरे आदर्श शिक्षक
ईश्वरी संदिप ढोरे
साईश्री संदिप ढोरे
समस्त वाकोडे परिवार, मंगरूळपीर

हार्दिक शुभेच्छा
युवा नेते, वाशीम जिल्हा परिषदचे मा. अध्यक्ष, राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष
मा. श्री. चंद्रकांतदादा ठाकरे
यांना वाढदिवसानिमित्त
हार्दिक शुभेच्छा
सौ. पल्लवी रतन वाघमारे — सरपंच
श्रीमती संगीता देविदास आवारे — ग्रामपंचायत अधिकारी
*संतोष वसंता भोयर, उपसरपंच
*शेख अकबर शेख मोहम्मद, सदस्य
*सौ. अन्नपुर्णा माणिक भगत, सदस्या
*सौ. छाया अशोक भगत, सदस्या
*शेख फकीर शेख जाफर, सदस्य
*सौ. शालु रामदास मनवर, सदस्या
*आफरीन परविन सय्यद उजेर, सदस्या
*विशाल देवराव भगत, सदस्य
*सौ. वदंना हरिदास गावंडे, सदस्या
समस्त ग्रामस्थ पोघात (घोटा)

हार्दिक शुभेच्छा
युवा नेते, वाशीम जिल्हा परिषदचे मा. अध्यक्ष, राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष
मा. श्री. चंद्रकांतदादा ठाकरे
यांना वाढदिवसानिमित्त
हार्दिक शुभेच्छा
शुभेच्छुक
हर्षा मुधकर उगले (काळे) ग्राम पंचायत अधिकारी
श्रीकांत सुर्यकांत काळे शिक्षक
अभिराम श्रीकांत काळे
सरपंच, उपसरपंच समस्त ग्रा.पं. सदस्य शेंदुरजना मोरे

हार्दिक शुभेच्छा
युवा नेते, वाशीम जिल्हा परिषदचे मा. अध्यक्ष, राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष
मा. श्री. चंद्रकांतदादा ठाकरे
यांना वाढदिवसानिमित्त
हार्दिक शुभेच्छा
प्रयंकाताई ज्ञानेश्वर कदम — सरपंच
श्रीमती वैशाली नितीन रोठे — ग्रामपंचायत अधिकारी
*जयाताई सतिष धामणे, उपसरपंच
*प्रतिभाताई प्रकाश बेलखेडे, सदस्या
*देवकाबाई दयाराम मुळे, सदस्या
* उमेश अनिल राठोड, सदस्य
*संगीताताई कैलास नगरे सदस्या
*ममताताई केशव जाधव, सदस्या
*पवन मधुकर जाधव, सदस्य
*विष्णु आत्माराम भोडणे, सदस्य
*शेषराव केशव धोंगडे, सदस्य
समस्त ग्रामस्थ माळशेलु

युवा नेते, वाशीम जिल्हा परिषदचे मा. अध्यक्ष, राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष
मा. श्री. चंद्रकांतदादा ठाकरे
यांना वाढदिवसानिमित्त हार्दिक शुभेच्छा
शुभेच्छुक
श्री. अविनाश गजानन राठोड सरपंच
ग्रा.पं. अधिकारी एस.एस. लोखंडे
सौ. शारदा बालाजी मोकळे उपसरपंच
सदस्यगण : - श्री. गणेश हरीचंद्र आडे, कु. कविता विठ्ठल इंगोले, सौ. कल्पना चव्हाण, श्री. राजु पांडुरंग खडसे, श्री गुरूनाथ आत्माराम चव्हाण, सौ. मिरा चरण जाधव, श्री. अक्षय सदानंद टोपले, सौ. लक्ष्मी सखाराम हंगणकर समस्त ग्रामस्थ पिंपळगाव शेगी

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक प्रदीप पुंडलिकराव देशमुख यांनी भास्कर प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड प्लॉट क्र. टी- ५१ एम. आय. डी. सी. फेज - ४, अकोला ग्रोथ सेंटर, येवता रोड, शिवणी, अकोला - ४४४००२ येथे मुद्रित करून सिटी न्यूज सुपरफास्ट कार्यालय, उत्सव संकुल, गांधी रोड, अकोला येथे प्रकाशित केले. ▪ **मुख्य संपादक : प्रदीप पुंडलिकराव देशमुख** ▪ **संपर्क** - 0724-2435573, 2444774 - email- citynewss80@gmail.com, RNI No.- MAHMAR/2012/49642, RRC Helpline No. 8484842135

CMYK CMYK